शनिवार, २४ डिसेंबर २०२२
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१२८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 24 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-128 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# लष्कराची बस दरीत कोसळली

## सिक्कीममध्ये १६ भारतीय जवानांना वीरमरण

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : उत्तर सिक्कीममधील झेमा येथे लष्कराच्या ट्रकला झालेल्या अपघातात लष्करातील १६ जवानांना प्राण गमवावे लागले असून ४ जण गंभीर जखमी झाले आहेत. वळण घेत असताना वाहन उतारावरून घसरल्याने हा अपघात झाला आहे. अपघाती वाहन दरीत कोसळले. गंभीर असलेल्या जवानांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**

शुक्रवारी सकाळी लष्कराच्या तीन गाड्या जवानांना घेऊन जात होत्या. हा ताफा चाटणहून थांगूच्या दिशेने निघाला होता. गेमा येथे जात असताना वळणावर तीव्र उतार असल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण अचानक सुटले आणि वाहन खाली दरीत कोसळले. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि बचावकार्य सुरू केले. ४ जखमी जवानांना हेलिकॉप्टरच्या साहाय्याने दरीतून बाहेर काढण्यात यश आले. या दुर्घटनेत जखमी झालेल्या तीन कनिष्ठ अधिकारी आणि १३ सैनिकांसह एकूण १६ जवानांचा मृत्यू झाला.

### जवानांच्या अपघाताचे वृत्त ऐकून अतीव दु :ख झाले : राजनाथ सिंह

उत्तर सिक्कीममध्ये झालेल्या एका रस्ते अपघातात भारतीय लष्कराच्या जवानांना वीरमरण आले, हे वृत्त ऐकून अतीव दु :ख झाले आहे . त्यांनी दिलेल्या सेवेबद्दल आणि वचनबद्धतेबद्दल देश त्यांचा मनापासून कृतज्ञ राहील . शोकग्रस्त कुटुंबांच्या दु :खात सहभागी आहे . जे जवान जखमी झाले आहेत त्यांना लवकरात लवकर बरे वाटावे, यासाठी प्रार्थना करतो, अशा आशयाचे ट्वीट संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले आहे .



# महाविकास आघाडीचे 'प्रती सभागृह'

## सोमवारी सीमा प्रश्नावर सरकारला ठराव घ्यायला भाग पाडू : अजित पवार



आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्षांना मराठी भाषिक लोकांना आधार देण्यासाठी, मराठी भाषिकांना महाराष्ट्र तुमच्या पाठीशी उभा आहे. सर्वजण तुमच्यासोबत उभे आहोत असे चित्र निर्माण करण्यासाठी दोन्ही सभागृहात ठराव एकमताने मंजूर करायला तयार आहोत त्यामुळे तो ठराव घ्या अशी विनंती करण्यात आली होती परंतु आज आठवडा संपतोय तरीही त्यांनी तो ठराव घेतला नाही मात्र सोमवारी तो ठराव कोणत्याही परिस्थितीत घेण्यास भाग पाडू अशा शब्दात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सरकारला ठणकावून सांगितले. भाजपच्या दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांना महाविकास आघाडीचे आमदार श्रद्धांजली वाहत आहे आणि दुसरीकडे शिंदेसरकार कामकाज करत आहेत. मुळात सरकारने विधानसभा सदस्य म्हणून आमदार मुक्ता टिळक यांना श्रद्धांजली वाहून कामकाज थांबवायला हवे होते, असे मत व्यक्त करत अजित पवार यांनी नाराजी व्यक्त केली. दरम्यान विधानभवनाच्या पायऱ्यांवर प्रती सभागृह भरवून महाविकास आघाडीच्या आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी शिवसेना नेते आमदार भास्करराव जाधव, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी आपले विचार मांडले व महापुरुषांचा अपमान करणाऱ्या सरकारचा निषेध केला.

# संपत्तीवर डोळा ठेवून केला श्रद्धाचा ब्रेनवॉश : वालकर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** श्रद्धा वालकरच्या हत्याकांडाने संपूर्ण देश हादरला. या प्रकरणाचा तपास अद्यापही सुरू आहे. श्रद्धा वालकरचे वडील विकास वालकर यांनी दिलेल्या मुलाखतीत एक धक्कादायक आरोप आफताब पूनावालावर केला आहे. आफताबने माझ्या संपत्तीवर डोळा ठेवूनच हा सगळा कट आखला असे त्यांनी म्हटले आहे. विकास वालकर म्हणाले की, आफताबला भेटल्यानंतर श्रद्धाच्या वागण्यात बदल झाला होता. आफताबच्या बोलण्यात ती इतकी गुरफटली होती की, ती आम्हाला उलट उत्तरेही देत असे. आफताब माझ्या मुलीला म्हणजेच श्रद्धाला आमच्या विरोधात भडकवत होता. माझ्या संपत्तीवर डोळा ठेवून त्याने तिचा ब्रेनवॉश केला होता, असे विकास वालकर यांनी म्हटले आहे. आज तक या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत हे वक्तव्य विकास वालकर यांनी केले आहे. श्रद्धा जेव्हा आमचे घर सोडून गेली आणि आफताबसोबत राहू लागली तेव्हा तिला मनाप्रमाणे वागण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळाले होते. श्रद्धाच्या वडिलांनी हे पण सांगितले की श्रद्धाच्या एका मित्राने त्यांना सांगितले होते आफताब श्रद्धाला मारहाण करतो. आफताबला कठोरातली कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी माझी मागणी असल्याचेही विकास वालकर यांनी या मुलाखतीत सांगितले. श्रद्धाच्या ब्रेनवॉशिंग मागे धर्म हे एक कारण असू शकते का? असा प्रश्न विचारला असता माझ्या मुलीचे आफताबने ज्या प्रकारे ब्रेनवॉश केलं होतं आणि तो ज्या प्रकारे माझ्या मुलीला भडकवत होता त्यावरून त्याचं नियोजन धर्माच्या दृष्टीतूनही असावं. या पद्धतीनेही तो हे सगळं करत होता का याचीही चौकशी झाली पाहिजे अशीही मागणी विकास वालकर यांनी केली. मला जेव्हा श्रद्धा आणि आफताब यांच्या नात्याबाबत कळले तेव्हा मला आफताबविषयी जाणून घ्यायचे होते. मात्र ते सगळं होण्याआधीच माझी मुलगी माझ्याविरोधात गेली होती. त्यासाठी तिला व्यवस्थित भडकवण्यात आले होते, असेही विकास वालकर म्हणाले.

# ३५ हजार वीज कामगारांचा अधिवेशनावर धडकला मोर्चा

## वीज कंपन्यांच्या खाजगीकरणाला प्रचंड विरोध


आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनावर महाराष्ट्र राज्य वीज कामगार, अभियंते, अधिकारी संघर्ष समितीच्या वतीने इदोंरा चौक येथून मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा एल.आय.सी.चौक येथे पोलिसांनी अडवला. तिन्ही वीज कंपनीन्याचे खाजगीकरण करण्याच्या राज्य सरकारच्या धोरणांच्या विरोधात सकाळी ११.०० प्रचंड घोषणा देत हजारो विज कामगार, अधिकारी अभियंते व कंत्राटी कामगार यांनी प्रचंड मोर्चा काढला.

या मोर्चामध्ये ३५,००० च्यावर वीज कामगार अभिंयते, अधिकारी व कंत्राटी कामगार सहभागी झाले होते. मोर्चा एलआयसी चौकामध्ये पोलीसांनी मोर्चा अडवल्यानंतर संघर्ष समितीमध्ये सहभागी संघटनांचे पदाधिकारी मोहन शर्मा, संजय ठाकूर, कृष्णा भोयर, शंकर पहाडे, आर.टी.देवकांत, सय्यद जहिरोद्दीन, दामोदर चंगोले, राजन भानुशाली, राजेश कठाळे, मधुकर सुरवाडे, एच.के. लोखंडे, संजय खाडे, नवनाथ पवार, प्रभाकर लहाने, दत्तात्रय गुंटे, उत्तम पारवे, ललित शेवाळे, प्रकाश गायकवाड, श्रीमती स्नेहा मिश्रा, विठ्ठल भालेराव, शिवाजी वायफळकर इत्यादी पदाधिकारी यांनी संबोधित करताना शासनाला चेतावणी दिली की, विद्युत कंपन्याचे खाजगीकरण करण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्रातील वीज ग्राहकांच्या हिताकरीता बेमुदत वीज कामगार संपावर जातील असा इसारा मोर्चात देण्यात आला. या मोर्चाला आमदार प्रकाश ठाकरे नागपूर, आमदार राजू पाटील परभणी यांनी संबोधित करून वीज कामगारांच्या मागण्यास पाठिंबा




दिला. वीज कंपन्यात कार्यरत ३० संघटनांनी संघर्ष समिती बनवून संघर्ष समितीच्या माध्यमाने निर्मिती,पारेषण व वितरण या तिन्ही कंपन्यां मध्ये कोणत्याही प्रकारचे खाजगीकरण सहन करणार नाही. जनतेच्या मालकीच्या या सार्वजनिक वीज कंपन्या जनतेच्या मालकीच्या राहिल्या पाहिजे,नफा कमविण्याच्या उद्देशाने येणाऱ्या खाजगी भांडवलदारांना वीज कंपन्या सोपवण्यात येऊ नये, अदानी इलेक्ट्रिकल लिमिटेड या खाजगी भांडवलदार कंपनीने महावितरण कंपनीचे कार्यक्षेत्र असलेल्या भांडुप परिमंडळातील ठाणे व वाशी मंडळात समांतर वीज वितरणाचा परवाना विद्युत नियामक आयोगाकडे मागितलेला आहे त्यास विरोध,तिन्ही वीज कंपन्यात रिक्त असलेले ४० हजार पदे तात्काळ भरावी,तिन्ही कंपन्यां मध्ये काम करणारे कंत्राटी व आऊटसोर्सिंग याना वीज कंपन्यांच्या नोकरीमध्ये सामावून घ्यावे, समान काम समान वेतन लागू करावे, इंनपॅनलमेंट द्वारे ठेकेराकडून करण्यात येणारे कामे बंद करावे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# शाश्वत समाधानाचे मुक्त विद्यापीठ : ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज



आधुनिक केसरी

ते म्हणाले, 'तुम्ही सगळे एवढी दगदग सोसून गोंदवल्यास येता, आपल्या समस्या मांडता. मी दरवेळी तुम्हाला त्याच त्याच गोष्टी सांगतो. नाम घ्यायला सांगतो. तरी प्रत्येक वेळी तुम्ही येथे येतातच हा सगळ्यात मोठा चमत्कार नाही का ?' गोंदवल्यास कशासाठी जायचे ? त्याचे महत्व काय हे सांगताना महाराज म्हणतात, 'जसे वडील मुलासाठी बँकेत पैसे ठेवतात आणि त्याचे व्याज आपल्या पश्चात मुलाला मिळावे अशी व्यवस्था करतात, त्याचप्रमाणे ज्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे त्यांना निदान अंतकाळी तरी सद्बुद्धी व्हावी म्हणून भरपूर भांडवल मी गोंदवल्याला ठेवले आहे. गोंदवल्याला आल्यावर त्याच्या बुद्धीत पालट झालाच पाहिजे. गोंदवल्यात महाराजांनी जे राममंदिर बांधले त्या रामावर महाराजांचे फार प्रेम होते. त्या त्यांच्यासाठी फक्त मूर्ती नव्हत्या. तर प्रत्यक्ष रामराया त्यांच्या रूपाने इथे वास करतो आहे ही त्यांची दृढ धारणा होती. रामरायाशी त्यांचा नित्य संवाद असे. त्यांचे रामावर इतके प्रेम होते की ते जेव्हा नैमिषारण्यात जायला निघाले तेव्हा प्रत्यक्ष रामरायाच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. जो जो मनुष्य त्यांच्याकडे जाई, त्याला ते म्हणायचे, 'अरे माझ्या रामाला एकदा डोळे भरून पहा आणि नंतर घरी जा.' एका भक्ताने त्यांना गोंदवल्याच्या रामाबद्दल विचारले असताना ते म्हणाले, 'ह्या रामापुढे उभे राहिले म्हणजे तो आपल्याला आपल्या अवगुणांची जाणीव करून देतो. आपल्या दोषांची जाणीव झाली तरच मनुष्य त्यातून सुटण्यासाठी रामाची प्रार्थना करून त्याला शरण जाईल. शरणागताला अभय देणे हे रामाचे ब्रीदच असल्याने तो त्या मनुष्याला संकटातून सोडवील आणि त्याचे काम होऊन जाईल.'' भुकेल्या व्यक्तीला उपाशी पोटी वेदांत सांगणे चुकीचे आहे,' असे स्वामी विवेकानंद म्हणत. गोंदवलेकर महाराजांनीही भुकेलेल्याना खाऊ घातले. आईच्या मायेने भरवले. आईला आपली मुले जेवताना पाहून जसे समाधान वाटते तसे महाराजांना त्यावेळी वाटत असे. अन्नदान, गोरक्षण आणि नामस्मरण या तीन गोष्टी महाराजांच्या आवडत्या. आजही गोंदवल्याला त्यांच्या उपदेशाप्रमाणे आचरण सुरु आहे. महाराजांचा शिष्यवर्ग मोठा आहे. गोविंद सीताराम गोखले यांनी महाराजांच्या प्रवचनांचे संकलन केले आहे. तारखेप्रमाणे दररोज एक प्रवचन वाचायचे असे त्याचे स्वरूप आहे. या प्रवचनांचे अनेक भाषात भाषांतर झाले असून त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. **क्रमश;**



# आनंदी पहाट

## डाएटिशियन म्हणून एक उत्तम करिअर संधी

आधुनिक केसरी

सध्याच्या धकाधकीच्या काळात फिटनेसला खूप महत्त्व आले आहे. आरोग्याबाबत लोक जागरूक, सजग होत आहेत. म्हणूनच फिटनेस ट्रेनरला खूपच वाव आहे. डाएट, न्यूट्रिशन, योगाचे अभ्यासक्रम पूर्ण करून फिटनेस ट्रेनर, न्यूट्रिशन एक्सपर्ट म्हणून काम करता येतं. कामाच्या अनियमित वेळांचा साहजिकच खाण्याच्या वेळांवरही अनावधानाने परिणाम होत असतो. त्यात सध्या जंक फूडचं महत्त्व लक्षात घेता, आहाराचं वेळापत्रक डळमळीत झालेलं आढळतं. अयोग्य आणि अनियमित वेळेला अन्नसेवन केल्यामुळे विविध आजार बळावतात. हे लक्षात आल्यामुळे आहाराविषयी लोकं जागरूक झाले आहेत. त्यातूनच आहारतज्ज्ञ किंवा डाएटिशिअनची गरज निर्माण होत चालली आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मोठमोठ्या दवाखान्यामध्येही रूग्णांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी एका डाएटिशियनची नेमणूक केलेली असते. खाद्यपदार्थ उत्पादक कंपन्या देखील नवीन ब्रॅंड तयार करण्याआधी ज्येष्ठ डाएटिशियनचे मार्गदर्शन घेत असतात. 'डाएटिक्स' अर्थात आहार शास्त्रात खाण्या-पिण्या संबंधित माहिती देऊन आरोग्य कसे चांगले ठेवता येईल, याचा अभ्यासक्रम असतो. हल्ली डाएटविषयीची जागरूकता भयंकर वाढली आहे. एकप्रकारे जनसेवा म्हणून देखील डाएटीशियन म्हणून करीयर करण्याची चांगली संधी युवापिढीसमोर आहे. आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी डाएटिंगवर लोक हजारो रुपये खर्च करत आहेत. डाएटिशियन क्लबचे सदस्य होऊन सातत्याने सल्ला मार्गदर्शन घेणाऱ्यांचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे. डाएटिशियन हा एक मार्गदर्शक आणि सल्लागार म्हणून काम करत असल्याने येणाऱ्या प्रत्येकाच्या आरोग्याची जबाबदारी त्याच्यावर येत असते. डाएटिशियन हा लोकांच्या खाण्यापिण्या पासून तर वाईट सवयींवर देखील लक्ष ठेवतो आणि नियमित व्यायाम, प्राणायाम तसेच दररोजच्या आहाराचे प्रमाण ठरवून देत असतो.



आधुनिक केसरी

## तुझ्याशी जुळली | नाळ देवा ||

भेटता विठ्ठला | आनंद मावेना ||
निर्गुण सगुणा | भेट झाली ||१||
आता भेद कैसा | उरला न मनी ||
हाच चक्रपाणी | वेष्णवांचा ||२||
अनंत जन्माच्या | पुण्याईचे फळ ||
नाम सर्व काळ | मुखी तुझे ||३||
मावळला स्वार्थ | मी पण गळाले ||
आता तेजाळले | ज्ञानदिप ||४||
मोह माया सारी | जळोनिया गेली ||
तुझ्याशी जुळली | नाळ देवा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# हनुमन्तरायांच्या बारा नावांचा महिमा


आधुनिक केसरी

अढळ श्रद्धा दे हनुमन्ता
चरणी ठाव दे अंजनीसुता
आत्मविश्वास दे वायूपुत्रा
आशीषबल दे महाबला
चारित्र्यसंपन्नता दे रामेष्ठा
सुखसमृद्धी दे फाल्गुनसखा
सृजनाची दृष्टी दे पिंगाक्षा
राष्ट्रप्रेम दे अमितविक्रमा
भव्यता दिव्यता दे उदधिक्रमणा
शोक संपवी सीताशोकविनाशना
आरोग्य दे लक्ष्मणप्राणदाता
अगर्वता नम्रता दे दशग्रीवदर्पहा



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर


# विषय, वासना, इत्यादी सोडून भगवंताला शरण जावे



आधुनिक केसरी

भगवंताचे अस्तित्व जिथे पाहावे तिथे आहे. भगवंताचे मर्म ओळखायला, मी कसे वागावे हे प्रथम पाहावे. भगवंत आहे की नाही हे जाणण्याकरिता आपल्याला बुद्धी दिलेली आहे. भगवंत निश्चित आहे हे काहींना अनुभवाने कळले. आपण त्यांचे आप्तवाक्य प्रमाण मानले. भगवंताचे अस्तित्व जर निश्चित आहे तर त्याची ओळख तरी कशी करून घ्यावी ? बीजगणितामध्ये उदाहरण सोडविताना एक अज्ञात 'क्ष' घ्यावा लागतो. उदाहरणाचे उत्तर येईपर्यंत त्या 'क्ष' ची खरी किंमत काय आहे हे आपल्याला कळत नाही. पण तो घेतल्याशिवाय चालत नाही. त्याप्रमाणे, जीवनाचे कोडे सोडविण्यासाठी आज अज्ञात असा भगवंत आपल्याला गृहीत धरलाच पाहिजे. त्या भगवंताचे खरे स्वरूप, जीवनाचे कोडे सुटेल त्यावेळी आपल्याला कळेल. खरोखर, जन्ममरणातून मुक्त होण्याचा मार्ग जो आपल्याला दाखवितो तो खरा आप्त. भगवंताला सर्वात अधिक काय आवडते हे संतांनी सांगून टाकले. ते म्हणजे ' आपण विषय, वासना इत्यादि सर्व काही सोडून भगवंताला शरण जावे. ' आपण नेहमी विषयांनाच शरण जातो. भगवंताला जो शरण गेला त्याला जगाची भितीच नाही उरत. सर्व चमत्कार करता येतात, पण भगवंताला शरण जाणे फार कठीण आहे. आपण जिना चढतो ते जिन्यासाठी नसून वरच्या मजल्यावर जाण्यासाठी असते. वरच्या मजल्यावर जाणे हे साध्य असून, जिना हे त्याचे साधन आहे. त्याप्रमाणे तीर्थयात्रा, व्रते, नेमधर्म ही साधने असून, परमेश्वरप्राप्ती हे आपले साध्य आहे. पण परमेश्वरप्राप्ती बाजूलाच राहिली आणि आपण साधनालाच घट्ट धरून बसलो आहोत याला काय करावे ? मूळ भगवंत हा निर्गुण, निराकार आणि अव्यक्त आहे, पण मनुष्य त्याला आपल्या कल्पनेमध्ये आणतो. आपल्या ठिकाणी असणारे गुण पूर्णत्वाने त्या भगवंताच्या ठिकाणी आहेत अशी आपण कल्पना करतो. याचा अर्थ असा की, आपण प्रथम भगवंताला जडामध्ये पाहतो, आणि मग त्याच्या नामाकडे जातो. भगवंताने केलेली ही सृष्टी, आहे तशीच सर्व जरूर आहे. तिच्यामध्ये बदल करायला नको, बदल आपल्यामध्ये करायला हवा. आपले सगळे जीवन जर भगवंताच्या हातामध्ये आहे, तर मग जीवनातल्या सर्व घडामोडी त्याच्याच हातात आहेत यात शंका कोणती ? झाडाच्या मुळांना पाणी घातले की त्याच्या सर्व भागांना ते पोहोचते, तसे, भगवंताचा विसर पडू न दिला म्हणजे सर्व काही बरोबर होते. भगवंत हवासा वाटणे, यामध्ये सर्व मर्म आहे. आत्मा हा समुद्रासारखा आहे; त्याचा अगदी लहान थेंब, त्याप्रमाणे हा जीव आहे. त्याची ओळख होऊन आत्म्याशी समरस होणे, हेच खरे तत्त्वज्ञान आहे. या आत्म्याचे नित्य स्मरण ठेवून आनंदात असावे. **आजचे बोधवचन आहे** - संतांनी नामस्मरणरूपी नाव आपणास दिली आहे. त्यात विश्वासाने बसू. संत हे कर्णधार आहेत, ते आपणास पैलपार नेतील.

# मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

***नसे अंत आनंत संता पुसावा।***
***अहंकार विस्तार हा नीरसावा।***
***गुणेंवीण निर्गूण तो आठवावा।***
***देहेबुधिचा आठऊं नाठवावा।।१६९।।***

**श्लोकार्थ :** अंत नसणारे अनंत परमात्म स्वरूप कसे आहे ते संतांना विचारावे. आपल्या मी चा पसारा नाहीसा करावा. गुणरहित अशा निर्गुण स्वरूपाचे स्मरण राखावे. देहबुद्धीचे स्मरण होऊ देऊ नये. **विवेचन :** ज्याला कसल्याही मर्यादा नाहीत, ना काळाच्या, ना व्याप्तीच्या, जो शाश्वत आहे, ज्याला अंत नाही तो अनंत. ज्याने अनंत जाणला आहे, तो संत. समर्थ सांगतात की या अनंताच्या चरणाशी बसून अनंत म्हणजे काय काय ते समजून घ्यावे. सध्या कलियुग सुरू आहे. आज या जगात संत नाहीत असे नाही, अडचण एकच आहे की सामान्य मनुष्याला संत ओळखता येत नाही. त्याचा संतांवर विश्वास बसत नाही. समजा विश्वास बसला तर मनुष्य संतांना कोणते प्रश्न विचारतो ? तर प्रपंचाचे ? उदा. माझ्या मुलीचे लग्न होईल का ? मुलगा उत्तीर्ण होईल का ? सासू फारच छळते, ती लवकर जाईल का ? मी कोट्यधीश कधी होईल ? असे अनेक प्रश्न आपल्याला माहीत असतील. प्रापंचिक मनुष्याला असे प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. संतांना या प्रश्नांची उत्तरे माहीत नसतात असे नाही, परंतु या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रपंच सोडून परमात्म्याच्या चरणी रत झालेल्या संतांना अशा प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी खाली यावे लागते. पृथ्वीच्या कक्षेबाहेर निवांत फिरणाऱ्या यानाला पुन्हा पृथ्वीच्या कक्षेत येऊन आम्हाला एक फेरी मारून आण असे सांगितले तर कसे वाटेल ? तसे सर्व संतांना या वरील प्रश्नांची उत्तरे देताना वाटते. सद्गुरू ब्रम्हचैतन्य महाराज असे प्रश्न विचारणाऱ्या लोकांना हिंगजिऱ्याची गिऱ्हाईक म्हणतात. खऱ्या कस्तुरीचा चाहता मिळत नाही असे श्रीगोंदवलेकर महाराज म्हणतात. इतके सारे असूनही सर्व संत माऊली असल्या कारणाने इतके सारे धोके पत्करून सर्व संत आपल्याला भक्ताचा प्रपंच सुखकर करतात जेणेकरून त्याचा परमार्थ बुडणार नाही. म्हणून सामान्य मनुष्याने संतांना शरण जावे आणि आपला प्रपंच त्यांच्या चरणी अर्पण करावा. असे केल्यास अशा मनुष्याचा प्रपंच आणि परमार्थ दोन्ही सुखाचे कधी होतात हे त्याला कळत देखील नाही. समर्थ म्हणतात **"धरीतां साधूची संगती ।आपषाच लागे स्वरूपस्थिती ।स्वरूपस्थितीनें बाणती । लक्षणें आंगीं ।।"**

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

आजपर्यंत अभ्यासलेल्या अनेक श्लोकांमध्ये समर्थ प्रामुख्याने देहबुध्दि सोडावी असे विविध प्रकारे समजावून सांगत आहेत. सामान्य मनुष्य मात्र देहबुद्धीमुळे आपला संसार मनानी वाढवितो आणि कोळी जसा स्वतःच विणलेल्या जाळ्यात अडकून पडतो, तसे त्यात अडकतो. प्रत्येकाच्या घरी नारळ असतो. नारळ देठाच्या बाजूने वरती उभा करून ठेवला तर कालांतरानी त्यातील पाणी सुकून जाते. खरंतर बाहेरून नारळ तसाच दिसतो, पण आत मात्र पाणी नसते. एका अर्थाने त्यातील मीपणा नष्ट झालेला असतो. संत असे असतात. सर्व संत या सुकलेल्या नारळासारखेच असतात. बाहेरून ते ओल्या नारळासारखे दिसतात म्हणजे पाणी असलेल्या नारळासारखेच दिसतात, मात्र आतून ते सुकलेले अर्थात देहबुद्धी समूळ नष्ट झालेले असतात. या आधीच्या श्लोकात आपण यानाचे उदाहरण पहिले. आपल्याला जर यानातून प्रवास करायचा असेल तर ज्याच्याकडे ते तंत्रज्ञान आहे, त्याचे मार्गदर्शन घ्यावे लागते. तद्वतच जर मनुष्याला देहबुध्दि नष्ट करायची असेल तर ज्याची देहबुध्दि पूर्णपणे नष्ट झाली आहे अशा मनुष्याचा ( संत ) सल्ला घ्यायला हवा. सर्व संत त्यासाठी सगुण भक्ती करावी असा सल्ला देत असतात. सामान्य मनुष्याला परमार्थ साधायचा असेल तर सगुणभक्ती करायला हवी आणि सगुणभक्ती करता करता निर्गुण परमात्मा जाणायला हवा. लहानपणी प्रत्येक आई आपल्या बाळासाठी आकाशीच्या चंद्राला चांदोमामा करते, त्या चांदोमामाच्या आधाराने बाळाचे बालपण फुलते, पण जस बाळ मोठा होत जातो, तसे त्याला चांदोमामा हा आपला मामा नसून तो पृथ्वीभोवती फिरणारा एक ग्रह आहे याचे ज्ञान होते.

# एक नवे साहित्यिक व्यासपीठ : वंजारी समाजाचे पहिले साहित्य संमेलन



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

प्राचीन कालखंडापासून विविध स्तरावर वाङ्मय निर्मिती अविरतपणे सुरु असून जो तो आपापल्या परीने समाजात नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतो आहे. स्वातंत्र्यपूर्व व नंतरचा कालखंड देशात विविध प्रादेशिक भाषेत वाङ्मय निर्मितीचा अत्यंत महत्वपूर्ण काळ. महाराष्ट्रात महात्मा ज्योतीराव फुले-सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या अनुषंगाने "विद्येविना मती गेली" या प्रकारच्या क्रांतिकारी कविता लिहून महाराष्ट्रचे अमुलाग्र आणि कृतीशील प्रबोधन करून सामान्यांना शिक्षणाभिमुख जीवन जगण्यास प्रवृत्त केले. त्यानंतर ज्योतीरावांच्या खांद्याला खांदा लावून राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समता आणि शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी प्रवाही करून समाजऋण फेडण्याचा ऐतीहासिक प्रयत्न केला. त्यानंतर अस्पृश्यतेचे अनंत चटके अंगावर घेत गावकुसाबाहेरील लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपली उभी हयात घालवली आणि दुर्लक्षितांचे आत्मभान जागे केले. याचा परिपाक म्हणजे मुठभर लोकांची बटिक असलेली लेखणी सामान्यांच्या हातात आली आणि खरेखुरे, वेदना-उपेक्षा-छळ-जाच-जुलूम-भेदाभेद-जातीच्या कडेकोट भिंतीच्या चटक्यांचे वाङ्मय लोकाभिमुख झाले. यातूनच उपेक्षित-दलित-आदिवासी वाङ्मय, स्त्री-व्यथा-वेदना वाङ्मय प्रकाशित झाल्या. अभिव्यक्ती स्वातंत्र्यशस्त्र सर्वसामान्यांच्या हाती दिल्यामुळे सगळे निरंकुशतेणे लिहायला-बोलायला लागले. यातून मराठी वाङ्मयात अनेक नवनवीन प्रवाह उदयास आले. अनेक नवोदित लेखकांना लेखन-व्याख्यानास नवनवी दालने खुली झाली.

यात वंजारी लेखक सुद्धा मागे राहिले नाहीत. तसे पहिले तर जंगल-जंगल फिरून, भटकंती करून, लोकांना रसद पुरविणारी वंजारी जात ही मुळातच दुर्लक्षीत आणि उपेक्षित! वंजारी या नावातच सर्वकाही आहे. जे लोक वनात राहून वनातील मिळणाऱ्या गोष्टी जसे डिंक, मध, औषधी वनस्पती जमा करून गावात आणून विकायच्या आणि त्यावर उदरनिर्वाह करणार ही काटक जात! मुळ राजस्थानातून व्यापाराच्या निमित्ताने भारतभर विखुरलेली ही जात देशाच्या एकूण लोकसंखेच्या मानाने अत्यल्प आणि कायम दूर्लक्षितच! एक खडतर इतिहास-भूगोल असतांना सुद्धा कालौघात या जातीच्या लोकांनी आपल्या काटक-दणकट-बुद्धिमान-आक्रमक या निसर्गदत्त गुणांच्या जोरावर भटकंती बंद करून डोंगर पायथ्यासी, जिथे जागा भेटेल तेथे वाडी-वस्तीच्या रूपाने स्थायिक झाले. मुळातच कष्टाळू आणि वारकरी सांप्रदायासी एकनिष्ठ असलेल्या या जातीतील स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या एक-दोन पिढ्या शिक्षणापासून वंचित राहिल्या, कारण कोणत्याच गोष्टींचे ज्ञान नसल्यामुळे वंजारी जातीच्या लोकांनी प्रथम समाजात आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि नंतर ही जात महाराष्ट्रात स्थिरस्थावर झालेली पाहायला मिळते. काळाच्या प्रवाहात वंजारी जात हळूहळू राजकारण-व्यापार-शिक्षण-शेती या विविध क्षेत्रात स्थिरावत गेली. यातच सर्वत्र शिक्षणाचा प्रचार-प्रसार झाला. त्यांतर देशात मंडल आयोगाप्रमाणे वंजारी जातीचा ओबीसी प्रवर्गात समावेश झाला आणि मुलांना नौकरी-शिक्षणात सोयी-सुविधा मिळायला लागला. वंजारी समाज शिकायला लागला. शिक्षणाने समाजाचे चित्र काही प्रमाणात बदलायला लागले. याचाच परिपाक म्हणजे वंजारी समाजातील तरूण-तरुणी विविध क्षेत्रात आपले अस्तित्व निर्माण करायला लागले. यातच वाङ्मय क्षेत्रसुद्धा पाठीमागे राहिले नाही. अनेक लेखक आपल्या कथा-कादंबरी-कविता-वैचारिक लेखन करायला लागले. आजमितीला महाराष्ट्रात शंभराहून अधिक लेखक-लेखिका असून त्यांनी मोठ्याप्रमाणात वाङ्मय निर्मिती केली आहे. वंजारी समाजातील सर्व श्री किशोर सानप, बाबाराव मुसळे, भास्कर बडे, सुलभा मुंडे, कैलास दौंड, एकनाथ आव्हाड, विवेक उगलमुगले, वा.ना.आंधळे, मनोहर आंधळे, शंकर बडे, सोपान हाळमकर, का.वा. सिरसाठ, शिवाजी हुसे, अनंत कराड, लक्ष्मण खेडकर, मंजुषा दराडे, अनंत कराड, बाळासाहेब गरकळ, स्वाती वणवे, मनीषा बडे, सुभाष शेकडे, शिवाजी घुगे, संगीता घुगे, ज्ञानेश्वर जाधवर, चंद्रकांत धस, मनोज दराडे, रामकिशन दहिफळे, दिगांबर मुंडे, राजेंद्र मुंडे, नागनाथ बडे, रमेश आव्हाड, लता गुठे, शिवा कराड, गणेश खाडे, बालाजी मुंडे, संजय तिडके, दत्ता खुळे, रंजना सानप, सिंधूताई दहिफळे, सुषमा सांगळे, गणेश आघाव, विठ्ठल जायभाये, अलकनंदा आंधळे आणि ज्ञात-अज्ञात वंजारी लेखकांनी वर्तमानात आपले वाङ्मय समाजाभिमुख केले आहे. ही सर्वच मंडळी मोठ्याप्रमाणात लेखन करत असली तरी या सर्वांचे लेखन उपेक्षिताचे जगणे जगत असतांना या सर्व सृजनांना कुठेतरी एक स्वतंत्र व्यासपीठ मिळणे क्रमप्राप्त असतांना वंजारी महासंघाचे अध्यक्ष आणि एक व्यासंगी लेखक श्री गणेश खाडे यांना आपणही वंजारी समाजातील सृजानांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे या अनुषंगाने वंजारी महासंघाची साहित्यिक आघाडी स्थापन करून साहित्य संमेलन घेण्याचा मनोदय महाराष्ट्रातील पहिल्या पिढीच्या लेखकांना विचारणा केली असता, या विषयाला तमाम महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर होकार मिळाला आणि त्यातूनच २५ डिसेंबर २०२२ रविवारी नाशिक येथे वंजारी समाजाचे पहिले साहित्य संमेलन होत आहे.

वंजारी समाजाच्या पहिल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान खांदेशरत्न, सुप्रसिद्ध कवी, लेखक प्रा.वा.ना.आंधळे भूषवत असून उद्घाटन जेष्ठ कादंबरीकार श्री बाबाराव मुसळे यांच्या हस्ते होणार आहे. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री प्रशांत आंधळे मागील दोन आठवड्यापासून अहोरात्र परिश्रम घेत असून दिवसभर चालणाऱ्या या सृजनांच्या मांदियाळीत सकाळी ग्रंथदिंडीने प्रारंभ होणार असून उद्घाटन कार्यक्रमाला नाशिक परिक्षेत्रातील अनेक राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी वंजारी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना स्व.सुंदराबाई मुरलीधर आंधळे साहित्यभूषण आणि समाजभूषण पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. उद्घाटनाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन श्री संदीप ढाकणे व श्री अनिल सानप करतील. संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात 'साहित्यातील संतांचे योगदान' या विषयावर परिसंवाद होत असून या सत्राच्या अध्यक्षस्थान ह.भ.प.डॉ.तुळसीदास महाराज गुट्टे भूषवत असून सौ.लत्ता गुठे (मुंबई), प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये (हिंगोली), श्री विवेक उगलमुगले (नाशिक) हे मान्यवर आपले विचार मांडतील. त्यानंतर लगेच जेष्ठ कथाकार डॉ.भास्कर बडे (बीड) यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन होणार असून यात प्रा.सुभाष शेकडे (पाथर्डी), सौ.रंजना सानप, प्रा.डॉ.संगीता घुगे (नांदेड), श्री अंबादास केदार (लातूर) हे कथाकार आपल्या कथा सादर करतील. या दोन्ही सत्राचे सुत्रसंचालन सौ.सुलभाताई मुंडे व आभारप्रदर्शन सौ.मनीषाताई बडे करतील. संमेलनाचे तिसरे सत्र कवी बिनधास्त किनगावकर श्री बालाजी मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध कवयित्री सौ.सिंधुताई दहिफळे यांच्या हस्ते होत असून या कविसंमेलनात महाराष्ट्रातील जेष्ठ-श्रेष्ठ-नामांकित चाळीस ते पन्नास कवी-कवयित्री आपल्या कविता सादर करतील. कविसंमेलनाचे सुत्रसंचालन श्री मनोज वराडे व आभार श्री दत्ता खुळे हे कवीमित्र करतील. या सर्वच कार्यक्रमांना वंजारी समाजातील सर्व मान्यवर लेखक, कवी, समीक्षक उपस्थित राहणार आहेत. या साहित्य संमेलनाच्या समारोपाच्या सत्रात अध्यक्षांच्या परवानगीने काही महत्वपूर्ण ठराव घेऊन ते शासनास सुपूर्द करण्याचा निर्णय होऊन हे संमेलन सायंकाळी ठीक ७ संपन्न होईल. तरी महाराष्ट्रातील तमाम साहित्यिक, रसिकांनी नाशिक येथील रावसाहेब थोरात सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे उपस्थित राहण्याचे आवाहन संमेलन अध्यक्ष प्रा.वा.ना. आंधळे, स्वागताध्यक्ष श्री प्रशांत आंधळे, वंजारी महासंघाचे अध्यक्ष श्री गणेश खाडे आणि सर्व संयोजक मंडळींनी केले आहे. हे संमेलन म्हणजे वंजारी समाजातील नव्या-जुन्या लेखकांना एक नवे-हक्काचे व्यासपीठ मिळाल्याचे साहित्यिकात सर्वत्र बोलले जात आहे.

# शिवसेना पक्षवाढीसाठी जिवाचे रान करील

## मा.आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर




आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** तालुक्याचे प्रवेशद्वार समजल्याजानार्या तलवाडा येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षामधे राष्ट्रवादी काँग्रेसचे मा.आमदार भाऊसाहेब चिकटगावकर यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून प्रवेश केला. त्यामुळे पंचायत समिती मा सभापती राजेंद्र मगर यांनी नव्याने पक्षात आलेले भाऊसाहेब चिकटगावकर यांचा मिरवणुक काढून जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. यावेळेस उपजिल्हाप्रमुख अविनाश पाटील गलांडे, उपजिल्हाप्रमुख संजय पाटील निकम, तालुकाप्रमुख सचिन वाणी, मनाजी पाटील मिसाळ, विठ्ठल डमाळे, भाऊसाहेब गलांडे, सजन शिंदे, मोहन साळुंके, रमेश सावंत, साईनाथ मतसागर, प्रशांत शिंदे, राजेंद्र मगर, रिखब पाटणी, भिकन सोमासे, गौतम पहेलवान, किशोर मगर संतोष सुर्यवंशी, संतोष निकम, प्रशांत हुकीरे, भाऊसाहेब शिंदे, घोगरे पाटील, संतोष जाधव,जालींदर दादा जाधव,के. एफ.जाधव, मगनराव जाधव, उद्धव तांबे,उत्तम काका निकम, शांताराम मगर, संदीप गायके, दत्तात्रय कुंदे, मगन जाधव, श्यामकाका मगर, विठ्ठल काका मगर, रामदास मगर, शंकर मगर, भाऊसाहेब मगर, जनार्दन मगर, आप्पासाहेब मगर, दत्तु वसंत मगर, आबासाहेब मगर, नवनाथ सोनवणे, सुनील सोनवणे आदींची उपस्थिती होती. या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती संजय निकम आणी माजी आमदार भाऊसाहेब चिकटगावकर यांच्यात अनेक वर्षे झालेल्या राजकिय चढाओढीवर जुगल बंदी रंगली संजय निकम यांनी जोरदार बॉलिंग करत चिमटे काढले त्यांना जोरदार बॅटिंग करत चिकटगावकर यांनी मार्मिक आणी खिलाडू वृत्ताने उत्तर देत जोरदार बॅटिंग केली यांच्या या जुगल बंदी नी उपस्थित कार्यकर्त्यां मध्ये एकच हशा पिकला. दरम्यान मी कुठली ही राजकीय महत्त्वाकांक्षी उद्देश ठेवून पक्षात आलो नसल्याचे माजी आमदार भाऊसाहेब पाटील यांनी सांगितले तसेच येणार्‍या काळात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा आमदार या तालुक्यात करू असा निर्धार चिकटगावकर यांनी व्यक्त केला. पुढे बोलतांना ते म्हणाले"पक्षवाढीसाठी जीवाचे रान करेन,पक्ष ज्याला तिकीट देईल त्याचे काम इमानेइतबारे करेन.जुन्या नव्या कार्यकर्त्यांचा समन्वय घडवुन आणेन.येणारया प्रत्येक निवडणुकीत पक्षाला एक नंबरचे स्थान मिळवुन देणार.राष्ट्रवादीत असताना ज्या चार लोकांना सर्वात जास्त मोठं केलं ते आज माझ्यापासून दूर गेले भविष्यात त्यांनी माझ्या अंत्यविधीला देखील येऊ नये.असेही भाऊसाहेब पाटील चिकटगावकर यांनी ठणकावले. यावेळेस पंचक्रोशीतील शिवसैनिक मोठ्या संख्येने हजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र मगर यांनी तर सूत्रसंचालन भिकन सोमासे यांनी तर आभार प्रदर्शन भाऊसाहेब मगर यांनी केले.

# "त्या" वासनांध शिक्षकाला सेवेतून कायमचे बडतर्फ करा : भाजपची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळा येथे कार्यरत असलेला वासनांध शिक्षक सय्यद एजाज टेंभुर्णीकर याने एका अल्पवयीन विद्यार्थिनीशी अश्लील चाळे केल्या प्रकरणी त्यास अटक झाली आहे.तसेच त्याचे निलंबनही झाले आहे. मात्र शिक्षकीपेशेसाठी कलंक असलेल्या अशा व्यक्तीस सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करावे अशी मागणी भाजपच्या वतीने तहसीलदारांना केली आहे.

जिल्ह परिषद कन्या शाळेत कार्यरत असणाऱ्या सय्यद एजाज टेंभूर्णीकर या सहशिक्षकाने मंगळवारी (ता.२०) दहावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीच्या घरी कोणीच नाही,याची संधी साधून तिच्याशी अश्लील चाळे केले होते.त्यामुळे त्याच्या विरुद्ध भा.दं.वि. कलम ३५४ (अ) व पोक्सो अंतर्गत कलम ७,८ अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीला तात्काळ अटक केली.तसेच शिक्षण विभागाने निलंबनाची कारवाई केली.मात्र यांचे पडसाद समाजात उमटू लागले असून शुक्रवारी भाजपने संबंधित शिक्षकास कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे.तसेच जर प्रशासनाने याकडे कानाडोळा केला तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपास्थित होऊ शकतो असा इशारा ही निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर भाजपाचे धर्माबाद तालुका अध्यक्ष रवींद्र शहराध्यक्ष, शहराध्यक्ष रामेश्वर गंदलवार, अमित मुंदडा, माधव समस्ते,नरसिंग पा. नरवाडे आदी कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हायब्रीड पद्धतीने उपचार करून काढली अन्ननलिकेची मोठी गाठ

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अगदी ९९ टक्के आपण अन्ननलिकेतील कर्करोग या आजाराविषयी ऐकून आहोत. केवळ एक टक्का लोकांमध्ये अन्ननलिकेत स्नायूंपासून तयार होणाऱ्या साध्या गाठी आढळून येतात. या गाठी मुख्यत्वे पुरुषांमध्ये (२:१) जास्त आढळून येतात. तसेच साधारणतः २० ते ५० वर्षे वयोगटात या गाठी पाहायला मिळतात. अन्ननलिका पूर्णतः काढल्यामुळे नेहमीसाठी त्या रुग्णाला खाण्याचा, झोपण्याचा आणि पचनाचा त्रास होत असत. असाच आजार घेऊन २८ वर्षांची बीड येथील तरुणी जीआय वन हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल झाली. नव्या पद्धतीच्या एंडोस्कोपी अल्ट्रासाऊंड दुर्बिणी द्वारे मेडिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. अशोक मोहिते यांनी तपासणी करून अन्ननलिकेतील गाठीचा तुकडा घेऊन लियोमायोमा असल्याचे खात्रीलायक निदान केले. त्यात गाठीचा आकार ८-१० सेंटीमीटर आणि ती गाठ अन्ननलिकेभोवती गोलाकार पसरली असल्याचे आढळून आले. सिटी स्कॅन आणि पेट सिटी तपासणी करून गाठ छातीच्या खालच्या भागात हृदयाच्या बाजूला तसेच जठरापर्यंत पोहोचल्याचे निदान झाले. सामान्यतः अशा रुग्णांना खुल्या शस्त्रक्रिये द्वारे अन्ननलिकेसोबतकाढावे लागते. परंतु, अन्ननलिका काढावी लागल्यास



होणाऱ्या त्रासाचा विचार करून आणि रुग्णाचे वय कमी असल्यामुळे तिचे कुटुंब पूर्ण नसल्यामुळे हायब्रीड शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. संदीप भालसिंग, डॉ. अशोक मोहिते आणि रुग्णाच्या नातेवाईकांनी घेतला. जीआय वन हॉस्पिटलमध्ये आजच्या काळातील उपलब्ध असलेल्या अत्यंत अत्याधुनिक साधनांचा वापर आणि सर्वोत्तम पद्धतींच्या साह्याने या रुग्णावर उपचाराचे निश्चित करण्यात आले. एंडोस्कोपीद्वारे अन्ननलिकेचे स्नायू आणि गाठ यांना अस्तरापासून दूर करण्याची अतिशय क्लिष्ट अशी प्रक्रिया डॉ. अशोक मोहिते यांनी पार पाडली. या प्रक्रियेत मेडिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. वैभव गंजेवार आणि डॉ. विनय झंवर यांचे सहकार्य लाभले. डॉ. संदीप भालसिंग आणि त्यांच्या टीमने तीन तासांच्या शस्त्रक्रियेनंतर गाठ पूर्णतः काढण्यात यश मिळवले. या प्रक्रियेत डॉ. मुकेश राठोड (सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट) यांचे सहकार्य लाभले. यावेळी भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. विजय दौंडे आणि डॉ. सुजाता झिने यांनी रुग्णाची प्रकृती उत्तम राहील याची काळजी घेतली.

# संजय राऊत यांचे प्रत्युत्तर

आधुनिक केसरी

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाच्या विरोधात मांडलेला ठराव कर्नाटकच्या विधानसभेने काल एकमताने मंजूर केला. यावेळी बोलताना कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी संजय राऊतांवर जोरदार टीका केली होती. संजय राऊत देशद्रोही असून ते चीनचे एजंट असल्याचे ते म्हणाले होते. दरम्यान, बोम्मईंच्या टीकेला संजय राऊतांनी प्रत्युत्तर दिलं आहे. दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. चीनने भारतात खुसखोरी केली आहे. त्याचप्रमाणे कर्नाटक महाराष्ट्रात घुसखोरी करते आहे, त्यामुळे आम्हालाही तोच मार्ग अवलंबावा लागेल, असं मी म्हटले होतो. जर बोम्मईंना चीनचा इतकाच तिटकारा असेल, तर आधी त्यांनी त्यांच्या पंतप्रधानांचा निषेध करावा, मोदींनीच चीनसाठी दरवाजे उघडले आहेत. महाराष्ट्र-कर्नाटक वादात तेल ओतण्याचे काम बोम्मई करत आहेत. अमित शहांबरोबरच्या बैठकीत जे ठरलं होतं, ते मानायला बोम्मई तयारी नाहीत आणि आज ते आमचे संस्कार आणि संस्कृती काढत आहे, आम्हाला त्यांनी संस्कृती आणि संस्कार सांगण्याची गरज नाही", असं प्रत्युत्तर संजय राऊत यांनी दिले आहे. आज बोम्मईंची जीभ चालते आहे, कारण शिंदे फडणवीस गप्प आहेत, असेही ते म्हणाले. काल विधानसभेत सर्वच विषयांवर चर्चा झाली आहे. गोंधळ झाला. अनावश्यक विषय चर्चेला आले. खोके सरकारचे आमदार ज्या पद्धतीने काल व्यक्तीगत विषयांवर बोलत होते, त्यांना कर्नाटकने मंजूर केलेल्या ठरावाबाबत माहिती नसावी? हे यांचे महाराष्ट्र प्रेम आहे. ज्यापद्धीने कर्नाटकने त्यांच्या विधानसभेत महाराष्ट्राला एक इचंही जमीन देणार नाही, असा ठराव मांडला. मुळात आम्हाला एक इंचही जमीन नको आहे, आम्हाला आमच्या हक्काचे बेळगाव, कारवार आणि इतर गावं हवी आहेत. हा आमचा कायदेशीर दावा आहे. मात्र, राज्याचे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री या विषयावर तोंड शिवून बसले आहे", अशी टीकाही त्यांनी केली. महाराष्ट्र कर्नाटक वाद बोम्मईंना त्यांच्या राजकीय फायद्यासाठी निर्माण केला आहे. आम्ही चीनचे एजंट असेल, तर तुम्ही कोणाचे एजंट आहात? जर तुम्हाला बोलायचा घटनात्मक अधिकार आहे, तर आम्हालाही सीमावासियांच्या हक्काबाबत बोलण्याचा घटनात्मक अधिकार आहे. महाराष्ट्रवर तुम्ही हक्क सांगता त्याला विरोध करण्याचा घटनात्मक अधिकार आम्हाला आहे", असेही ते म्हणाले. कर्नाटक सरकारने ज्याप्रकारे महाराष्ट्राविरोधात निषेध ठराव मंजूर केला, त्याचप्रमाणे महाराष्ट्रानेही कर्नाटकविरोधात विधानसभेत निषेध ठराव मंजूर करावा, अशी मागणीही त्यांनी केली. कर्नाटक सरकार महाराष्ट्रातील नेत्यांवर खटले दाखल करत आहे, माझं राज्य सरकारला आव्हान आहे, त्यांनी बोम्मईंविरोधात महाराष्ट्रात खटला दाखल करून दाखवावा, असेही ते म्हणाले.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# राजकारणात महिलांचा टक्का वाढला पाहिजे

आधुनिक केसरी

**सध्या असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे महिलांच्या कर्तृत्वाची नोंद होत नाही. पुरुष जे काही करू शकतात, ते स्त्रियादेखील उत्तमप्रकारे करू शकतात. त्या काकणभरही मागे नाहीत. अन्य क्षेत्रासह राजकारणातही महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे. तो वाढला पाहिजे. शिवाय स्त्रिया निवडणुकीत भाग घेतात, पण जिंकल्यानंतर त्यांचे पती किंवा पुत्र पुढे पुढे करत असतात. जिंकून आलेल्या महिलांना त्यांचे स्वतःचे काम घरातले लोक करू देत नाहीत. सर्व प्रकरणे तेच निकालात काढतात. असे चित्र सर्वत्र सारखेच आहे.**

ही परिस्थितीदेखील बदलायला हवी आहे. महिलांना राजकारणात मोठ्या प्रमाणात संधी देण्याबरोबरच त्यांना स्वतःची कामे स्वतः करण्याची संधीही दिली पाहिजे. तरच भारतीय राजकारणात महिलांचे स्थान भक्कम होऊ शकेल.

हिमाचल प्रदेश आणि गुजरात विधानसभेत निवडून गेलेल्या नगण्य आमदार संख्येने पुन्हा एकदा महिलांच्या राजकारणातील सहभागाबाबत चर्चा रंगू लागली आहे. वास्तविक मुख्य प्रवाहातील राजकारणात महिलांच्या कमी उपस्थितीची चर्चा राजकीय पक्षांकडून दीर्घकाळापासून केली जात आहे, परंतु विचारपूर्वक तोडगा काढण्याबाबत क्वचितच प्रामाणिकपणा दिसून येतो. यावेळी, हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर अठ्ठावन्न सदस्यांच्या विधानसभेत एकच महिला आमदार निवडून आली आहे. मात्र, या निवडणुकीत विविध पक्षांच्या एकूण चोवीस महिला उमेदवार उभारल्या होत्या. महिला मतदारांची संख्या पाहता त्यांचे प्रमाण 49 टक्के आहे. निवडणुकीच्या निकालानंतर समोर आलेल्या आकडेवारीनुसार यावेळच्या विधानसभा निवडणुकीत पुरुषांच्या तुलनेत महिलांचे मतदान अधिक (76.8 टक्के) होते. तथापि, 2017 च्या विधानसभा निवडणुकीतही एकूण जागांच्या बाबतीत चित्र फारसे चांगले नव्हते आणि केवळ चार महिला विजयी झाल्या होत्या. या निवडणुकीत मात्र महिला प्रतिनिधीत्वाच्या दृष्टिकोनातून निर्माण झालेली परिस्थिती आणखीनच दयनीय झाली आहे. दुसरीकडे, गुजरातमध्येही गेल्या विधानसभा निवडणुकीतील तेरा लोकप्रतिनिधींच्या तुलनेत यावेळी केवळ दोन महिला प्रतिनिधींची वाढ झाली आहे. तेथे विधानसभेची एकूण क्षमता एकशे ब्याऐंशी आमदारांची असून यावेळी एकूण एकशे 39 महिला रिंगणात होत्या.

अलिकडे प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा यासाठी आवाज उठवला जात आहे, सरकारकडूनही अनेक विशेष उपाय योजले जात आहेत, अशा काळात राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व कमी होणे हे निश्चितच प्रत्येकासाठी चिंतेचा विषय आहे. पण ही परिस्थिती फक्त हिमाचल प्रदेश किंवा गुजरातसारख्या राज्यांमध्येच आहे असे नाही. गेल्या आठवड्यात सरकारने लोकसभेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार आंध्र प्रदेश, आसाम, गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश, केरळ, कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, ओडिशा, सिक्कीम, तामिळनाडू आणि तेलंगणा या राज्यांमध्ये 10 टक्क्यांपेक्षा कमी महिला आमदार आहेत. देशाच्या संसदेत थोडीफार सुधारणा झाली असली तरी आजही लोकसभा आणि राज्यसभेत महिला खासदारांचा वाटा सुमारे चौदा टक्के आहे. म्हणजेच सामान्यतः निम्मी लोकसंख्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महिलांचा सहभाग आजही मुख्य प्रवाहातील राजकारणात समाधानकारक पातळीवर पोहोचलेला नाही. सत्य हे आहे की, राष्ट्रीय राजकारणातील प्रतिनिधित्वाच्या निकषावर कोणताही सामाजिक घटक मागे राहिला, तर त्याचा थेट परिणाम इतर सर्व क्षेत्रांतील उपस्थितीवर होतो.

जे राजकीय पक्ष महिलांच्या हक्कांबद्दल बोलत राहतात, तेच आपल्या पक्षीय रचनेत बदल दाखवताना कच खात आहेत. निवडणुकीच्या वेळी महिलांना तिकीट देण्याच्या बाबतीत तेवढा उत्साह दाखवत नाहीत. संसद आणि विधानसभेत महिलांना तेहतीस टक्के आरक्षण देण्याचा मुद्दा गेली सुमारे अडीच दशके लटकत आहे. याबाबत कधी-कधी बोलले जाते, मात्र महिला आरक्षणाचा कायदा करण्याबाबत राजकीय पक्षांकडून कधीच ठोस पुढाकार घेतला जात नाही. संसदेत अनेक विधेयके चर्चेविना मंजूर होत असतानाही राजकीय पक्ष महिलांना संसदेत



आणि विधानसभांमध्ये कायदेशीर प्रतिनिधित्व देण्याबाबत गंभीर दिसत नाहीत, याचे कारण काय? ज्या राज्यांमध्ये स्थानिक पातळीवरील निवडणुकांमध्ये महिलांसाठी राखीव जागा निश्चित करण्यात आल्या आहेत त्या राज्यांमध्ये त्यांचे प्रतिनिधित्व काही प्रमाणात वाढले आहे.

मुळात विविध राजकीय पक्षांमध्ये सक्रिय असलेल्या महिला पदाधिकाऱ्यांची संख्या फारच कमी आहे. बहुतेक महिलांना निवडणुकीत तिकीटही त्यांच्या कुटुंबामुळेच मिळते. राजकारणातील महिलांचा प्रभाव वाढवण्यासाठी सर्वप्रथम त्यांना विद्यार्थी दशेत राजकारणात पुढे आणायला हवे. म्हणजेच राजकारणाविषयीचे प्रशिक्षण मिळायला हवे. महिलांना केवळ पदांची गरज नाही, तर त्यांना राजकीय अनुभवही मिळाला पाहिजे. असे मानले जाते की जिथे स्त्रियांचा सन्मान केला जातो, पूजा केली जाते तिथे देवता 'वास' करतात. महिला आज कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. राजकारणातही महिला सक्रिय आहेत. त्यात वाढ व्हायची असेल तर त्यांना प्रेरणा, आदर आणि स्वातंत्र्यासह काम करण्याची मोकळीक देण्याची आवश्यकता आहे. राजकारणात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी त्यांना स्वतः पुढे येऊन आपली पात्रता सिद्ध करावी लागेल. प्रारंभी महिलांनी स्थानिक लोकहिताच्या प्रश्नावर आवाज उठवून समाजात आपला ठसा उमटवला पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तिकीट घेऊन आपला उमेदवारी दाखवून दिली पाहिजे. अशा प्रकारे ती आपल्या क्षमतेच्या जोरावर जिंकून संसदपर्यंत पोहोचू शकेल. राजकीय पक्षांनी पात्र महिलांना निवडणूक लढवण्याची संधी दिली पाहिजे. आणि महत्त्वाचे म्हणजे महिलांसाठी आरक्षणाचे विधेयक जे लोकसभेत प्रलंबित आहे ते त्वरीत मंजूर झाले पाहिजे.महिलांच्या राजकारणात सक्रिय सहभागासाठी महिला आरक्षणासंबंधीचे प्रलंबित विधेयक मंजूर करावे. पुरुषांनी त्यांचे जुने विचार बदलले पाहिजेत आणि स्त्रियांना राजकारणात पुरेशा संधी दिल्या पाहिजेत. महिलांनी स्वाभिमानाने जगले पाहिजे. त्यांना पुरुषांवरील अवलंबित्व सोडावे लागेल. आता राजकारणातच नव्हे तर सर्वत्र स्त्री आणि पुरुषांना दोघांना समान दर्जा असल्याने त्यांना राजकारणातही समान संधी मिळायला हवी. महिलांनीही याचे भान ठेवायला हवे.आणि आपल्या हक्कासाठी लढले पाहिजे. राजकारणात महिलांचा सहभाग वाढवण्याचे अनेक मार्ग आहेत. खरे तर महिला प्रत्येक क्षेत्रात चांगले काम करत आहेत. जर महिलांना राजकारणात अधिकाधिक संधी दिल्या गेल्या, तर नक्कीच त्या राजकारणातही यशस्वी होतील. इंदिरा गांधी हे त्याचे जिवंत उदाहरण आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांचे वर्णन दुर्गेचा अवतार असे केले होते. राजकारण आणि इतर वैविध्यपूर्ण क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवणे खूप महत्वाचे आहे. सर्वत्र महिला शक्ती केंद्राची स्थापना झाली पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे.आता महिलांनीच महिलांसाठी आवाज उठवला पाहिजे.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# जागतिक खेळांमध्ये भारत मागे का ?

आधुनिक केसरी

**लियानेलं मेस्सीच्या अर्जेंटिनाने फ्रांसवर रोमहर्षक विजय मिळवत फुटबॉलचा विश्वचषक आपल्या नावे केला. कतारमध्ये पार पडलेली ही विश्वचषक स्पर्धा सर्वार्थाने यशस्वी ठरली. फुटबॉलच्या विश्वचषकात संपूर्ण जग महिनाभर न्हाऊन निघाले. जगभरातील ३४ देश या स्पर्धेत सहभागी झाले होते. अर्थात हे सर्व संघ पात्रता फेरीत विजय मिळवून विश्वचषकासाठी पात्र ठरले होते. विश्वचषक खेळणाऱ्या ३४ संघांची यादी पाहिली तर त्यात घाना, इक्वेडर, ट्युनिशिया, सेनेगल, उरुग्वे यासारखे देशांची नावे दिसतात. हे देश जगाच्या नकाशात शोधायला गेले तर लवकर सापडणारही नाही. अगदी टिंबा एव्हढ्या या देशांची लोकसंख्याही काही लाखांच्या घरात. बरे हे देश प्रगत म्हणावे तर तसेही नाहीत.**

अमेरिका आणि आफ्रिका खंडातील मागास म्हणून गणना होणारे हे देश . तरीही फुटबॉलमध्ये कौशल्य दाखवून जागतिक पटलावर चमकणारे देश. याउलट आपला देश क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगातील सातव्या क्रमांकाचा देश. लोकसंख्येत जगात दुसरा क्रमांक. १४० कोटी लोकसंख्या असलेला खंडप्राय देश पण फुटबॉलमध्ये पहिल्या शंभरातही नाही. आशिया खंडातील चीन, जपान, दक्षिण कोरिया, कतार, सौदी अरेबिया, इराण या देशाचे खेळाडू विश्वचषक स्पर्धेत आपल्या देशासाठी घाम गाळतात. भारत मात्र यात कुठेही दिसत नाही ; याची खंत ना देशातील क्रीडा रसिकांना ना राज्यकर्त्यांना. देश स्वातंत्र्य होऊन ७५ वर्ष उलटली तरी आपण फुटबॉलमध्ये प्रगती का करू शकलो नाही याचा विचार करायला कोणाकडेच वेळ नाही. बरं ही गत फक्त फुटबॉलचीच आहे असेही नाही तर ऑलिम्पिकमध्येही आपली हीच गत आहे. ऑलिम्पिकमध्ये अन्य देश जिथे डझनावारी पदके मिळवतात तिथे आपल्या देशाला एका हाताच्या बोटावर मोजता येईल इतके पदके मिळतात आणि ते ही ठराविक खेळातच. फुटबॉल असो वा ऑलिम्पिक यासारख्या जागतिक खेळात आपला देश मागे का आहे ? याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. आपल्या पेक्षा अविकसित देश खेळात आपल्यापेक्षा कितीतरी पुढे आहेत . त्या देशात जागतिक दर्जाचे खेळाडू तयार होतात मग आपल्या देशात का होत नाही याचा विचार राज्यकर्त्यांनी करायला हवा. क्रीडा क्षेत्राबाबत आपले सध्याचे जे धोरण आहे ते याला कारणीभूत आहे का ? याचाही गांभीर्याने विचार व्हायला हवा. देशातील खेळाडूंना सर्व सुविधा मिळतात




का ? त्यांना खेळण्यासाठी पोषक वातावरण आहे का ? हे पाहण्याचे काम राज्यकर्त्यांचे आहे ते त्यात निश्चितपणे कमी पडत आहेत. आपल्या देशात क्रीडा क्षेत्रातही राजकारण शिरले आहे ते आधी बाजूला सारले पाहिजे. सरकारने क्रीडा क्षेत्र राजकारण मुक्त केले पाहिजे. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचे खेळाडू जास्तीतजास्त पदके मिळवतील आणि पुढील चार वर्षात भारतीय फुटबॉल संघ किमान पहिल्या शंभरात येईल याचे नियोजन आतापासूनच करायला हवे. पुढील ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकून देतील आणि फुटबॉलमध्ये देशाचे नाव उज्ज्वल करतील असे खेळाडू हेरून त्यांना आतापासूनच सर्व सुविधा पुरवून प्रशिक्षण द्यायला हवे. खेलो इंडिया सारख्या उपक्रमात केवळ वैयक्तिकच नव्हे तर सांघिक खेळांचाही समावेश करून त्या खेळातील खेळाडूंना विदेशातील तज्ज्ञ प्रशिक्षकांमार्फत प्रशिक्षण द्यायला हवे. त्यांना हवे त्या सर्व सोयी सुविधा पुरवायला हव्यात. सर्वात महत्वाचे म्हणजे देशात क्रीडा संस्कृती रुजवायला हवी. त्यासाठी शालेय स्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत. शाळा महाविद्यालयात क्रीडा हा विषय गांभीर्याने घेतला जात नाही. आजही खेळाच्या तासाला इंग्रजी आणि गणित विषय शिकवला जातो. शाळा महाविद्यालयात क्रीडा हा विषय केवळ केवळ नावापुरताच आहे. पालकही मुलांना खेळापेक्षा अभ्यासाकडे जास्त लक्ष देण्यास सांगतात. खेळाला आपल्याकडे कायम दुय्यम नजरेने पाहिले जाते. ऑलिम्पिक आणि जागतिक दर्जाचे खेळाडू तयार करायचे असेल तर खेळाबाबतची आपली मानसिकता बदलायला हवी.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गावचा कारभारी निवडला पुढे काय ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील ग्राम पंचायत निवडणुकीचा धुराळा संपला.ग्राम पंचायतची निवडणूक राजकीय पक्षाच्या चिन्हावर होत नाहीत.पण राजकारणाची नशा आता ग्राणीण भागापर्यत पोहचलेली आहे. गावात पातळीवरच्या निवडणुकीत दोन गट परस्पराविरोधात दंड थोपटत असतात.यातून गावा-गावात गटबाजीतून तणाव,संघर्ष आणि डोकेफोड होत असते. गावचा गट कोणत्या पक्षाच्या नेत्यांचे समर्थक आहेत, हे लक्षात येते. या निवडणुकूतून ग्रामीण मतदारांचा कौल कोणत्या पक्षाकडे आहे, याचेही संकेत मिळतात. काँग्रेस पक्षाची मुळे खेड्यापर्यंत गेलेली होती, त्यामुळे तर पक्षाला राज्य व राष्ट्रीय पातळीवर यश मिळत गेले.आता भाजपाचे विचार व धोरणे खेड्यापर्यंत गेली आहेत, हे नाकारता येणार नाही. यात ग्रामपंचायत निवडणुकीच्या निकालाची आकडेवारी बोलकी आहे.**

विधानसभा व लोकसभा निवडणूक ही राज्य व राष्ट्रीय प्रश्नावर होत असते, हे खर आहे! पूर्वी सरकार काय करतात! राजकीय नेते काय बोलतात!हे खेड्यापर्यंत पोहचण्याचे कोणतेही माध्यम नव्हते.आता सगळच बदलय! ग्रामीण भागापर्यंत प्रसार माध्यम, वृत्त वाहिन्या, इंटनेट, मोबाईल सेवा पोहचली आहे.देशातील प्रत्येक घटना खेड्यापर्यंत पोहचत आहे.आता खेड्यात चावडीवर राजकीय चर्चा, खडांजगी होताना दिसून येतात.ग्रामीण भागात सामान्य कार्यकर्ता पक्षाचा कणा आहे, तो पक्षाचे विचार लोकापर्यंत पोहचविण्याचे काम करतो.हाच कार्यकर्ता लोकसभा व विधानसभा पक्षाला मदतीला धावून येतो. तेंव्हा भाजपाने ग्रामीण भागात पाय रोवले आहेत,हे लक्षात घेतले पाहिजे! राज्यात ७ हजार ६८२ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा धुराळा उडाला होता,तो शांत झाला आहे.या निवडणुकीत भाजपा सर्वाधिक जागा २०१३ जिंकून तो अव्वल क्रमांक मिळविला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने १२१५ दुसऱ्या तर बाळासाहेब शिवसेना ७७२ जागेवर विजय मिळवून तिसऱ्यास्थानी. काँग्रेस पक्ष ८६१ जागा जिंकून चौथ्या क्रमाकांवर आणि उध्दव ठाकरे शिवसेनेला ६३९ जागेवर यश मिळाल्याने तो पाचव्या स्थानकावर गेला आहे,असे प्रसार माध्यमांनी दिलेले आहे.यावरून दावे- प्रतिदावे केले जात आहेत. या निवडणुकीत १४ हजार २८ सदस्य, तर ६९९ सरपंच निवडून आले. यावेळी ६३ ग्राम पंचायतीच्या सरपंच-पदासाठी एकही अर्ज दाखल केलेला नाही. राज्यात काँग्रेस पक्षाची खेड्यापर्यंत पकड होती ती आता कमी होत चाललेली आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ग्रामीण मराठा मतदारांच्या मध्यमातून आपली ताकद मजबूत करतो आहे. दुसरीकडे शिवसेनेतील अंतर्गत मतभेदामुळे मतांची विभागणी झाल्याचे दिसून येत आहे. शिवसेनेच्या दोन्ही गटाने जिंकलेल्या जागेची बेरीज केली तर ती १४११ होते. म्हणजेच राष्ट्रवादी पक्षापेक्षा शिवसेनेने अधिक जागा जिंकल्या आहेत.तेंव्हा उध्दव ठाकरे यांनी शिवसेना पक्षावरच कुऱ्हाड मारुन घेतली आहे, हे दिसतेय! लोकशाहीत 'पंचायत राज' ला बळकट करण्यासाठी गाव पातळीवरच्या निवडणूका तितक्या महत्वाच्या आहेत.राज्यात३३ जिल्हा परिषद, ३५१ पंचायत समिती व २८ हजार ३ ग्राम पंचायत समिती आहेत. मुंबई ग्राम पंचायत कायदा १९५८ कलम ५ नुसार ग्राम पंचायत कारभार चालत असतो.नवीन ग्राम पंचायत स्थापन करण्याचे अधिकार हे विभागीय आयुक्तांना आहेत.महाराष्ट्र निर्मितीनंतर १ मे १९६२ पासून स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फेत गाव पातळीवर विकास करण्यासाठी स्व. वसंतराव नाईक यांनी केलेल्या शिफारशीनुसार जिल्हा परिषद,पंचायत समिती व ग्राम पंचायत अशी त्रिस्तरीय व्यवस्था स्विकारली गेली. त्यानंतर काँग्रेस सरकार 'पंचायत राज' बळकट करण्यासाठी २४ एप्रिल १९९३ मध्ये ७३ वी घटना दुरूस्ती केली.त्यामुळे पंचायत राज संस्थाना घटनात्मक दर्जा मिळाला.पण याकडे दुर्लक्ष केले गेले. महाराष्ट्रातील जिल्हा परिषद संस्था म्हणजे 'मिनी मंत्रालय' समजले जाते.स्थानिक स्वराज्य संस्था राजकीय अड्डे बनले आहेत. देशात अनेक राज्यात जिल्हा परिषदा नाहीत.त्यात

राज्याच्या शेजारी असलेल्या तेलंगणा व आंध्र प्रदेशात व्दीपध्दतीय म्हणजे मंडळ प्रजा समिती अथवा तालुका पंचायत समिती आहे.७३ व्या घटना दुरूस्तीवेळी महाराष्ट्रात जिल्हा परिषदांची गरज आहे काय?अशी विचारणा केंद्राने राज्य सरकारला विचारणा केली होती.पण महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला ग्रामीण नेतृत्व जीवंत ठेवायचे होत,तेंव्हा राज्य सरकारने जिल्हा परिषद बरखास्त करण्यास विरोध केला व तसा अहवाल केंद्राला पाठविला. राज्यातील ग्राम पंचायतील थेट निधी दिला जात आहे.तेंव्हा जिल्हा परिषदेचा पांढरा हत्ती का पोसावयचा? राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेतून मतदार संघातून विधान परिषदेवर प्रतिनिधी पाठविला जातो. त्यासाठी जिल्हा परिषद ,पंचायत समिती अध्यक्ष,सभापती, सदस्य,नगरपालिका सदस्यांना मतदान करण्याचे अधिकार आहेत. पण गावच्या सरपंच व उपसरपंचाला मतदानाचा अधिकार नाही.स्थानिक स्वराज्य मतदार संघातील आमदार स्वेच्छा निधी राजकीय सोयी देतात. यात टक्केवारी असतेच म्हणा! आता कोठे! सरपंचाला मानधन सुरू करण्यात आल आहे.राज्य सरकारने सुधारित घटनेचे पालन करणे बंधनकारक केले आहे यामुळे मात्र राज्य सरकारला पूर्वीप्रमाणे पंचायत राज कारभारात हस्तक्षेप, मनमानी करू शकत नाही. त्याच बरोबर मात्र गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक यांना ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. ग्रामसभा ही खऱ्याअर्थाने लोकशाही संस्था आहे.गावातील सामान्य माणसाचा आवाज राज्य शासनापर्यंत पोहचावा,या उद्देशाने मुंबई ग्राम पंचायत कायदा १९५८ कलम ७ (अ) तरतूद केली आहे. अनेक गावात ग्रामसभा केवळ कागदावर सह्या घेवून होतात.कंधार तालुक्यातील आंबुलगा येथील ग्रामसेवकाने एका महिलेला जन्म, वडिलाचे मृत्यू ,वारसदार प्रमाणपत्र अडवणूक केल्याची तक्रार महिलेने केली,तसेच आत्मदहनाची नोटीस बजावली. जि.प.मुख्य कार्यअधिकारी महिला अधिकारी असूनही त्यांनी दखल घेतलेली नाही.काही ग्रामसेवक कारभार भ्रष्ट व उंटावरून शेळ्या हाकणारा कारभार चालत असतात. त्याला लगाम घालता आला पाहिजे. महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सबंधात १८ जून१९८४ मध्ये प्राचार्य पी.बी. पाटील समिती स्थापन केली होती.या समितीचा अहवाल १९८६ मध्ये आला.या समितीच्या सर्व शिफारशी तत्कालिन विलासराव देशमुख यांनी मान्य केल्या,पण त्यांनी जनतेतून थेट सरपंच निवडणुकीची शिफारस मान्य केली नाही.राज्यात भाजपा व शिवसेना युती सरकारने ३ जुलै २०१७ रोजी थेट जनतेतून सरपंच निवडण्याचा निर्णय घेतला.त्यानंतर पुन्हा काँग्रेस सरकारने हा निर्णय घेतला,यातून गावपातळीवर सरपंचपदासाठी गटबाजीला ऊत आला.त्यामुळे गावाच्या विकास कामावर परिणाम होवू लागला.तेंव्हा २०२२ मध्ये पुन्हा भाजपा व बाळासाहेब ठाकरे शिंदे सरकारने जनतेतून थेट सरपंच निवडणुकीचा निर्णय घेतला. भाजपा केवळ राजकीय फायद्यासाठी निर्णय घेत आहे, असा काँग्रेस पक्षाचा जो आरोप आहे.तो चुकीचा आहे.कारण काँग्रेस राजवटीतच पाटील समितीने सरपंचची थेट निवडीची शिफारस केली होती.

गावाचा कारभारी निवडला खरा! पुढे काय करणार! केंद्र व राज्य शासनाच्या सुमारे १४४० योजना आहेत.यातील शंभर तरी योजना गाव पातळीवर राबविल्या जातात काय? ग्राम पंचायतीला मिळणाऱ्या आज वित्त आयोगामार्फत थेट ग्राम पंचायतला निधी दिला जातोय.पंधराव्या वित्त आयोगाची सुरुवात १ ५ एप्रिल २०२० पासून सुरु झाली आहे. या वित्त आयोगाने २०२१-२०२२ते २०२५-२०२६ पर्यंत २ कोटी ३६ लाख ८०५ हजार रूपायाची शिफारस केली आहे.यात स्वच्छता व गावाला स्वच्छ पिण्यास मिळावे,यावर भर दिला आहेत. त्यासाठी १कोटी ४२ लाख ८४ हजार रुपयायाला सशर्त मंजुरीची देण्यात आली आहे.वित्त आयोगाचा गावातील प्रति माणसी ९७५ रुपये याप्रमाणे निधी दिला जातोय. १४ व्या वित्त आयोगानुसार ४८८ रूपये दिला जात होता. केंद्र शासनाला महाराष्ट्राला ५ हजार ७२७ कोटीचा निधी मंजूर केला आहे. यातील ८० टक्के ग्रामपंचायत व २० टक्के पंचायत समिती व २० टक्के जिल्हा परिषदेला मिळतो.गावाला राज्यवित्त आयोग,म.गांधी ग्रामीण रोजगार योजना, स्वच्छताअभियान, घरकुल योजना, सर्वशिक्षा अभियान, बालविकास योजना, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य, राष्ट्रीय पेयजल, जिल्हा परिषदेचा निधी, अनुसूचित जाती जमातीसाठी निधी, ठक्कर बाप्पा समिती, पंचायत समिती, खासदार आमदार निधी, पंतप्रधान विकास निधीमिळतो. म्हणजे पैश्याला कमी नाही. या गावाचा भले करणारा कारभारी पाहिजे. ग्राम पंचायतला मिळणाऱ्या तेंव्हा ग्राम विकास समितीने ३१ डिसेंबरपूर्वी गरजेनुसार विकास आराखडा तयार करून तो पंचायत समितीला पाठवयाचा असतो.त्यानंतर राज्य शासन गावांच्या विकास आराखड्याला मंजूरी देते.केंद्र व राज्य मार्फत मिळणारा निधी खर्च करण्याचे निकष आहेत.त्यानुसार गावात विविध कामे घेता येतात. आज राज्यात ग्रामपंचायतींना कोट्यवधीचा निधी मिळत अजून खेडी भकास का आहेत? केंद्र व राज्य शासनाकडे बोट दाखविले जाते! गाव पातळीवर मिळणाऱ्या निधीचे काय होते? त्याचा योग्य नाही विनियोग होत नाही काय? गावांच्या प्रश्नांकडे राजकीय नेते,प्रशासकीय यंत्रणा गांभिर्याने लक्ष देत नाही.वित्त आयोगाच्या माहितीनुसार ३० लाख ४ हजार ५० पेक्षा अधिक निधीचा अनेक गाव पातळीवर खर्च होत नाही. पूर्वीप्रमाणे गावात पाटीलकी व देशमुखी राहिलेली नाही.पूर्वी गाव पातळीवरच्या राजकारणावरून सुप्रसिध्द साहित्यिक व ग्रामीण कथाकार शंकर पाटील यांच्या कथेवरून १९६८ मध्ये 'एक गाव बारा भानगडी' मराठी चित्रपट काढला गेला.तो चित्रपट अतिशय गाजला. आज आरक्षणामुळे गावच्या सरपंचपदाचा मान समाजातील ओबीसी, मागासवर्गीय, आदिवासी, महिला वर्गाला मिळत आहे. राज्यात अनेक गावात विकास कामे होत आहेत,पण अजून तरी समाधानकारक नाही. औरंगाबाद जवळ असलेल्या पटोदा गावाने गावाचा कायपालट केलेला आहे. हे येथे जाऊन पाहिल्यानंतर 'शासन जे करी ते 'गाव'करी असे आहे. देशात अनेक गावात शहराप्रमाणे रस्ते, पिण्याची पाण्याची सोय,आरोग्य सेवा, इंटरनेट सेवा,बँका आदी सर्व सेवा उपलब्ध आहेत. ग्रामीण भागात रस्ते बांधणी,आरोग्य व शिक्षण सेवा, पिण्याची पाणी, विद्युत व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, स्वच्छता तसेच शेती व पशुधन सुधारणा योजना राबविता येऊ शकतात. इतकेच नव्हे, गावपातळीवर तरूणांना छोटे - छोटे रोजगार मिळणारे उद्योग सुरु करता येवू शकतात.नांदेड जिल्ह्यात प्रा. शंभुनाथ कहाळेकर यांनी संकल्पनेतून ग्रामीण भागात चालणारे उद्योग तत्कालिन पालकमंत्री डी.पी. सावंत यांनी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून सुरू केले होते. 'नांदेड पॅटर्न' हा राज्यात काय देशात लागू करता आला असता,याबाबत पाठपुरावाही करूनही लक्ष गेले नाही.हा नेत्यांचा करंटेपणाच आहे.राज्यात ग्राम पंचायत निधीत भ्रष्टाचार होत असल्याच्या असंख्य तक्रारी येत आहेत. मागील इतिहास पहाता, २००५ मध्ये भारत निर्माण योजना अस्तित्वात आली. राज्यात २००८ मध्ये ग्रामीण पुरवठा समितीमार्फत योजनेला सुरुवात झाली.यात कोट्यवधी रूपायांचा गैरव्यवहार झाला.बुलडाणा जिल्ह्यात २०१७ मध्ये १४०० गावात सुमारे दोन हजार कोटीचे प्रकरण राज्यात गाजले.त्याच प्रमाणे २००८ मध्ये केंद्राच्या निर्मल योजने अंतर्गत ग्रामीण शौचालय बांधकाम योजनेचाही बोजवारा उडाला. काँग्रेस राजवटीत ग्रामीण योजनेतील भ्रष्टाचाराची कोट्यवधीची उड्डाणे आहेत. बारामती तालुक्यात २८ वर्षापासून त्रिशंकू ग्रामपंचायत ही कागदोपत्री असल्याचे उजेडात आले.यात ७० अधिकाऱ्यांवर कारवाईचा केली जाणार आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात ४० ग्रामसेवकांना भ्रष्टाचाराच्या तक्रारीवरून एका झटक्यात निलंबित केल गेले.पण दवाबानंतर चौकशी समिती नियुक्ती केली!आधी निलंबन नंतर चौकशी, हा काय प्रकार आहे? काँग्रेस राजवटीत प्रशासन भ्रष्टाचाराला अनियमितता म्हणून भ्रष्टाचाराची प्रकरणे दडपविली.यात राजकीय नेते प्रशासनाचे भले होत असे.एका मनसे कार्यकर्त्याच्या तक्रारीची दखल घेत जिल्हा परिषद प्रशासनाने ही कारवाई केली. या जिल्हा परिषदेत काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता होती. पण ते या घटनेवर मूग गिळून गप्प आहेत. यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न होत आहे. तेंव्हा मनसेचे नेते राज ठाकरे यांनी दखल घेतली पाहिजे. गाव पातळीवर योजना व निधी भरपूर आहेत. पण त्यांची अमंलबजावणी योग्य पध्दतीने होत नाही. ग्राम पंचायत पातळीवर मिळणारा निधी व तो कोठे खर्च होतो? याबाबत माहिती देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२० मध्ये ई-ग्राम - स्वराज्य मोबाईल एप्लिकेशन सुरु केले.पण राज्यात बहुसंख्य ग्राम पंचायतीने ही सेवा कार्यान्वित केलेली नाही. यात राज्य सरकारची उदासीनता दिसून येते. गाव पातळीच्या या निवडणूका छोट्या वाटत असल्या तरी गावाचा कारभारी निवडताना तो निस्पृह! विकासाची जाण, धडपडणारा, अभ्यासू असला पाहिजे, याची पारख गावकऱ्यांनी केली तरच खेड्यांचा विकास झपाट्याने होईल, यातूनच राज्याची व राष्ट्राची प्रगती होऊ शकते.




# नायलॉन मांजापासून सावधान !



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**यावर्षी सुध्दा मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नागपूर नायलॉन मांजाच्या विक्री व खरेदीवर बंदी आहे. तरीही यावर्षीसुध्दा नायलॉन मांजाची विक्री सर्रास होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.साधारणता 25 डिसेंबर नंतर पतंगीचा जल्लोष दिसून येईल.त्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजा खरेदी करणारे बहाद्दर आतापासूनच नायलॉन मांजा खरेदीच्या तयारीत असल्याचे दिसून येते. नागपूरात सर्वाधिक नायलॉन मांजाची आवक उत्तर प्रदेशच्या बरेली आणि गुजरातच्या वडोदरा येथून होत असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच नायलॉन मांजा धोका समाप्त झालेला नाही. त्यामुळे नायलॉन मांजावर बंदी असुन सुद्धा विक्री सर्रास होवू शकते याला नाकारता येत नाही. नायलॉन मांजा मानव आणि पशु-पक्षांसाठी जीवघेना व घातक आहे त्यामुळे नायलॉन मांजाचा "बहिष्कार" सर्वच स्तरातून होने अत्यंत गरजेचे आहे.**

संक्रांत म्हटली की पतंग आलीच पतंगी शिवाय संक्रांत अधुरी असल्याचे लहान मोठ्याना वाटत असते.परंतु काही नागरिक व मुलं यांनी जर चुकीचा मार्ग अवलंवीला किंवा निष्काळजीपणा केला तर मोठ्या प्रमाणात जिवीत हानी होते याला नाकारता येत नाही. नायलॉन मांजाच्या बंदीबद्दल गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक संघटना, संस्था व जनता आवाज उचलत आहे आणि गेल्या 10 वर्षात अनेक दुर्घटना होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत हानीसुध्दा झाल्याचे सर्वांनाच ग्यात आहे.यात काहींना आपला प्राण सुध्दा गमवावा लागला. कायद्याच्या माध्यमातून मागील तीन वर्षापासून नायलॉन मांजावर पुर्णतः बंदी घालण्यात आली आहे.तरीही सध्याच्या परिस्थितीत "नायलॉन मांजा" सर्रास विक्रीला येण्याची चिन्हे दिसत आहेत.मागील वर्षी नायलॉन मांजामुळे नागपुरमध्ये 300 हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात व पशुपक्षांच्या 600 हुन अधिक दुर्घटना झाल्याचे निदर्शनास आले.त्याचप्रमाणे मागिलवर्षी गुजरातमध्ये पतंगबाजीमध्ये 800 हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात यात छतावरून पडुन 100 हुन अधिक घायल झालेत व 10 जनांचा मांजाने गळा कापुन मृत्यू झाला अशा भयानक घटना नायलॉन मांजामुळे वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या आहेत. दिनांक 5 जानेवारी 2021 ला अंगावर शहारे येणारी घटना कोराडी परीसरात घडली पतंग पकडतांना रेल्वेखाली कटुन 12 वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. म्हणजेच पतंगीच्या नादात जीवीत हाणी केव्हाही ओढावु शकते. याला नाकारता येत नाही.त्यामुळे सावधगिरीचे उपाय म्हणून घरातील परिवाराने डोळ्यात तेल घालून मुलांवर करडी नजर ठेवण्याची गरज आहे.कोणत्याही दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता "नायलॉन मांजाचा बहिष्कार"अत्यंत आवश्यक आहे.या भयानक घटनेमुळे नायलॉन मांजाला "जिवघेना मांजाच"म्हणावा लागेल.ह्या घटना मोजक्या राज्यातील आहेत. परंतु संपुर्ण भारतात नायलॉन मांजामुळे मानवी व पशुपक्षांच्या हजारो दुर्घटना दरवर्षी होत असतात.एखाद्या विजेच्या ताराला जर पतंग अडकली तर विजेचे तार एकमेकांवर आदळतात व त्याचा स्पार्क होतो अशा वेळेस पतंग उडविणाऱ्याला कदाचित आपला प्राणसुध्दा गमवावा लागतो.त्यामुळे मी सर्व पतंग शौकीनांना विनंती करेल की नायलॉन मांजाला येणाऱ्या नविन वर्षाच्या निमित्ताने "टाटा बाय बाय"करून कॉटनच्या धाग्याने पतंग उडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सर्वांना माहीत आहे की दरवर्षी नायलॉन मांजामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी होते व वेळप्रसंगी अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागतात.त्याच प्रमाणे अनेक पशु-पक्षांनासुध्दा आपले प्राण गमवावे लागतात. पक्षांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती अत्यंत गंभीर, भयावह व बिकट आहे. कारण आज वाढत्या प्रदूषणामुळे त्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.पक्षांना हवेत जास्त वेळ रहावे लागते.त्यामुळे त्यांना प्रदुषणाचा व आता नायलॉन मांजाचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागतो. असे सांगण्यात येते की "लॅन्सेट मेडिकल जर्नल"च्या अहवालावरून असे दीसुन येते की प्रदुषणाच्या बाबतीत संपूर्ण जगाचा विचार केला तर"भारत प्रदुषणाचे माहेरघर"बनल्याचे दीसुन येते.यामुळे भारतात दरवर्षी प्रदुषणामुळे 30 हजार लोकांना आपले प्राण गमवावे लागतात यांच्या तुलनेत पक्षांची दुप्पटीने म्हणजे प्रदुषणामुळे 60 हजार पक्षांची जिवीत हानी होते. त्यामुळे आपणाला प्रदुषणावर जेवढी मात करता येईल तेवढी अवश्य करावी. परंतु संक्रांतीच्या शुभपर्वावर नायलॉन मांजामुळे पक्षांची जिवीत हानी होणार नाही याची काळजी व जबाबदारी आतापासूनच जनतेने घ्यावी. पोलिस विभाग याबाबत सतर्कता बाळगुन लाखो रुपयांचा नायलॉन मांजा जप्त करेलच व करीत आहे. परंतु जनतेनी पोलिस विभागाला सहकार्य केले पाहिजे. नायलॉन मांजा हा मांजा नसुन "जहरीली तलवार"आहे कारण आपला किंवा पक्षांचा गळा "कळत न कळत" केंव्हाही कापु शकते. मागील वर्षी अनेकांचा मांजराने गळा कापल्या गेला यात ते गंभीर जख्मीसुध्दा झालेत. त्यामुळे पतंग उडविताना सावधगिरीने पतंग उडवावी व नायलॉन मांजाचा "बहिष्कार"करावा. पतंग उडवा परंतु जीवाशी खेळु नका यातच सर्वांची भलाई आहे. कारण एक छोटीशी चूक मोठा हादसा घडवु शकते याला नाकारता येत नाही. संक्रांतीचा आनंद भरपूर घ्या! परंतु जिवावर बितण्यालायक कोणतेही कृत्य होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी.यातच सर्वांचा आनंद आहे. कायदा व पोलीस विभाग आपले काम करते.परंतु आपणच तटस्थ रहालो तर नायलॉन मांजावर मात करू शकतो याला नाकारता येत नाही.सध्याच्या अत्याधुनिक युगात नायलॉन मांजाची विक्री ऑनलाईनेसुध्दा होवू शकते. मकरसंक्रांतीच्या पाश्वभूमीवर प्रशासन प्लास्टिक पतंग आणि नायलॉन मांजा जप्तीची कारवाई युद्ध पातळीवर करणार यात शंका नाही. सरकारने सर्वप्रथम ऑनलाईन नायलॉन मांजावरील विक्रीवर बंदी आणायला पाहिजे. अशा कठीण परीस्थितीत नायलॉन मांजाला रोखण्यासाठी प्रशासनापेक्षा समाजाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. तेव्हाच नायलॉन मांजा हद्दपार होवु शकतो.त्यामुळे याकरिता प्रशासन व आमजनता यांच्यात तालमेल असने गरजेचे आहे. यावर सरकारने जातीने लक्ष दीले पाहिजे. परंतु आम जनतेनीसुध्दा यावर लक्ष ठेवण्याची अत्यंत गरज आहे. पालकांनी आतापासूनचआपल्या मुलांना नायलॉन मांजा पासुन दुर ठेवण्याचा काटेकोरपणे प्रयत्न करावा व नायलॉन मांजराचे दुष्परिणाम समजून सांगावे.सरकार व पोलीस विभाग यावर लक्ष ठेवुन आहे.परंतु नागरिकांचेसुध्दा कर्तव्य आहे की जी वस्तु "घातक आणि जिवघेनी"आहे आणि ती आपण रोखु शकतो ती रोखलीच पाहिजे."यामुळे अपघातावर आळा बसेल व पशुपक्षांचे प्राण वाचतील"पतंगीचा आनंद भरपूर घ्या.

# राष्ट्रीय गणित दिवस




प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**आपल्या संपूर्ण शालेय जीवनाच्या अभ्यासात, सर्वात महत्त्वाचा असणारा विषय म्हणजे गणित. फक्त उच्च शिक्षणाच्या दृष्टीनेच नाही तर रोजच्या दैनंदिन व्यवहारीक आयुष्यात देखील अविभाज्य घटक असलेला विषय म्हणजे गणित! असं खूप कमी वेळा होतं की एखाद्याला विचारावं तुझा आवडता विषय कोणता आणि त्याने सांगावं की ' गणित ' ...कारण इतर गद्य विषयांच्या तुलनेने गणिताचा अभ्यास करणे, सूत्र पाठ करणे , ताळाबेरिज करणे, अपेक्षित अचूकता हे सर्व लहान वयातील मेंदूला थोडे क्लिष्ट वाटते.**

परंतु जर वेळीच गणिताची गोडी निर्माण झाली तर पुढे मेडिकल, इंजिनिअरिंग अशा कोणत्याही क्षेत्रातील उच्च शिक्षण घेताना, त्या अभ्यासक्रमाचा अभ्यास करताना कठीण जात नाही. तर आज ह्या विषयाचा आवर्जून उल्लेख करण्याचें कारण म्हणजे आज आहे राष्ट्रीय गणित दिवस! त्या अनुषंगाने आजच्या ह्या दिवसाचा इतिहास, महत्त्व जाणून घेण्या विषयी हा लेख! ज्यांच्या स्मरणाने हा दिवस गणित दिवस म्हणून ओळखला जातो त्या गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या विषयी आणि त्यांच्या योगदानाविषयी माहिती नवीन पिढीला होणे गरजेचे आहे. भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी 22 डिसेंबर 2012 रोजी, चेन्नई येथे आयोजित एका कार्यक्रमात घोषणा केली की, दरवर्षी 22 डिसेंबर हा राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा केला जाईल. दरवर्षी 22 डिसेंबर रोजी महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती आणि गणिताच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यासाठी हा दिवस राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्या मागचा मुख्य उद्देश आजच्या काळात गणिताचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचविणे हा आहे. भारतात विविध शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांमध्ये राष्ट्रीय गणित दिवस साजरा केला जातो. या दिवशी विविध स्पर्धा, गणितीय उपक्रम आणि गणितीय प्रश्नमंजुषा आयोजित केल्या जातात ज्यात देशभरातील गणितातील हुशार विद्यार्थी सहभागी होतात. श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ रोजी कोइम्बतूरच्या इरोड गावात ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव कोमलताम्मल आणि वडिलांचे नाव श्रीनिवास अयंगार होते. लहानपणी रामानुजन इतर सामान्य मुलासारखेच होते. त्यांना वयाच्या तीन वर्षांपर्यंत



होईपर्यंत बोलताही येत नव्हते. वयाच्या दहाव्या वर्षी त्याने प्राथमिक परीक्षेत संपूर्ण जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. वयाच्या १५ व्या वर्षी त्यांनी 'ए सिनोप्सिस ऑफ एलिमेंटरी रिझल्ट्स इन प्योर अँड एप्लाइड मॅथेमॅटिक्स' नावाचे एक पुस्तक त्यांनी पूर्ण वाचून काढले. या पुस्तकात हजारो प्रमेये आहेत. ज्याचा त्यांनी पूर्ण अभ्यास केला.पुढे मग त्यांना शिष्यवृत्ती देखील मिळाली. १९११ मध्ये त्यांचा जर्नल ऑफ इंडियन मॅथमॅटिकल सोसायटीमध्ये १७ पानांचा एक पेपर प्रकाशित झाला. १९१२ मध्ये रामानुजन यांनी मद्रास पोर्ट ट्रस्टमध्ये लिपिक म्हणून काम करण्यास सुरुवात केली, पण तोपर्यंत त्यांना एक हुशार गणितज्ञ म्हणून मान्यता मिळाली होती. पहिले महायुद्ध सुरु होण्याच्या काही महिन्यापूर्वी रामानुजन ट्रिनिटी कॉलेजमध्ये आले. 1916 मध्ये त्यांनी बॅचलर ऑफ सायन्सची पदवी प्राप्त केली. 1917 साली ते लंडन मॅथेमॅटिकल सोसाईटीसाठी निवडले गेले. पुढील वर्षी त्यांना एलीप्टिक फंक्शन आणि संख्या सिद्धांतावरील संशोधनासाठी रॉयल सोसाईटीचा फेलो म्हणून निवडण्यात आले. त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये ते ट्रिनिटी कॉलेजचे फेलो म्हणून निवडण्यात आलेले पहिले भारतीय ठरले. रामानुजन यांनी तेथे 20 रिसर्च पेपर पब्लिश केले. 1918 साली त्यांना रॉयल सोसायटी ऑफ लंडनचा सदस्य बनवण्यात आलं. भारत पारतंत्र्यात असताना रामानुजन यांची सोसायटीचा सदस्य म्हणून निवड होणे ही खरंच मोठी बातमी होती. रॉयल सोसायटीच्या इतिहासात रामानुजन यांच्या इतक्या कमी वयाचा कोणीही आजवर सदस्य झाला नव्हता. रामानुजन यांना ब्रिटनचे वातावरण सहन न होऊन 1917 मध्ये त्यांना टीबी झाला. 1919 मध्ये त्यांनी प्रकृती फारच बिघडली. त्यामुळे ते भारतात परत आले. 26 एप्रिल 1920 साली वयाच्या 32 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पण आजारी असतानाही त्यांनी आपलं गणितासंबंधी काम कधी सोडलं नाही. रामानुजन यांनी अनेक प्रमेय तयार केली आहेत, ज्यातील अनेक अजूनही सुटू शकलेली नाहीत. त्यांचे एक रजिस्टर 1976 मध्ये ट्रिनीटी कॉलेजमध्ये मिळाले होते, ज्यात अनेक थेरम आणि फॉर्म्युले आहेत. या रजिस्टरला 'रामानुजनची नोट बुक' असं म्हटलं जातं. यातील अनेक थेरम सामान्यांच्या आवाक्याबाहेर आहेत. रामानुजन यांची बायोग्राफी 'द मॅन हू न्यू इंफिनिटी' 1991 साली पब्लिश झाली होती. 2015 मध्ये त्यांच्या जीवनावर आधारित 'THE MAN WHO KNEW INFINITY' चित्रपट प्रदर्शित झाला होता. यामध्ये अभिनेता देव पटेल यांने रामानुजन यांचे पात्र साकारले आहे. रामानुजन आजच्या ह्या नवीन अद्ययावत साधनांच्या, तंत्रज्ञानाच्या काळातही केवळ भारतीयच नाही तर परदेशी गणित तज्ज्ञांसाठी प्रेरणास्तोत आहेत ही खरोखरच भारतीयांसाठी गौरवास्पद आणि अभिमानास्पद बाब आहे. आणि म्हणूनच, गणितज्ञ रामानुजन यांना आजच्या या स्मरण दिनी शतशः नमन!

# पिंपळाच्या पानांचा रस आरोग्यासाठी गुणकारी

आधुनिक केसरी

पिंपळाच्या पानांमध्ये औषधी गुणधर्म असतात. याच्या पानांचा रस पिणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. पिपळाच्या पानांमध्ये अनेक पोषक तत्व असतात, जे अनेक गंभीर आजार टाळण्यास मदत करतात. कॅल्शियम, मॅंगनीज, तांबे, लोह यांसारखी खनिजे आणि प्रथिने, फायबर यांसारखी पोषक तत्त्वे पिंपळाच्या पानांमध्ये आढळतात. पिंपळाच्या पानांमध्ये भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडेंट, अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीबॅक्टेरियल आणि अँटीडायबेटिक गुणधर्म असतात, जे अनेक आजारांपासून दूर ठेवण्यास मदत करतात.

**फुफ्फुस निरोगी ठेवा :-** पिंपळाची पाने फुफ्फुसासाठी फायदेशीर आहेत. पिंपळाच्या पानांचा रस फुफ्फुसांना डिटॉक्स करण्याचे काम करतो. हा रस प्यायल्याने फुफ्फुसातील जळजळ होण्याची समस्याही दूर होते. जर तुम्हाला श्वास घेण्यास त्रास होत असेल तर पिंपळाच्या पानांचा रस प्यायल्याने ही समस्या दूर होऊ शकते.

**खोकला आराम :-** पिंपळाच्या पानांमध्ये असलेले गुणधर्म खोकला दूर करण्यासाठी प्रभावी ठरतात. याच्या रसाचे सेवन केल्याने खोकल्याची समस्या दूर होते, हा रस प्यायल्याने श्लेष्माची समस्या देखील दूर होते.

**पचनासाठी फायदेशीर :-** पिंपळाच्या पानांचा रस प्यायल्याने डायरियाची समस्या दूर होते. जर तुम्हाला डायरियासोबतच मळमळण्याची समस्या असेल तर या रसाच्या सेवनाने या समस्येपासून सुटका मिळते. याशिवाय हा रस गॅस, अपचन, बद्धकोष्ठता आणि पोट फुगण्याची समस्या दूर करतो.

**रक्त स्वच्छ करा :-** पिंपळाच्या पानांचा रस डिटॉक्स ड्रिंक म्हणून काम करतो. हा रस प्यायल्याने रक्त शुद्ध होते. रक्तातील अशुद्धता दूर झाल्यामुळे त्वचेच्या समस्या दूर होतात. हे पेय प्यायल्याने चेहऱ्यावरील पिंपल्स आणि डाग देखील दूर होतात.

**साखर नियंत्रण :-** हे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचे काम करते. पिंपळाच्या पानांमध्ये असलेले गुणधर्म स्पाइक नियंत्रित करतात आणि साखरेची पातळी सामान्य ठेवण्यास मदत करतात. पिंपळाच्या पानांचा रस मधुमेहाच्या रुग्णांसाठीही फायदेशीर आहे.

**दात आणि हिरड्या निरोगी करा :-**
पिंपळाच्या पानांचा रस दात, हिरड्यांसाठीही फायदेशीर आहे. यामुळे तोंडातील बॅक्टेरिया नष्ट होतात आणि दात निरोगी राहतात. पिंपळाच्या पानांचा रस प्यायल्याने हिरड्यांच्या त्रासातही आराम मिळतो.

# साधक ते श्रीसद्गुरूपर्यंतची जीवनगाथा : ईश्वरेच्छा



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आधुनिक केसरी

**अध्यात्मिक पातळीवर आत्मिक अनुभूती आणि निरंतर आनंद प्राप्तीचा ध्यास घेतलेले, आत्मरंगी सदैव रंगलेले, संपर्कात येत असलेल्या प्रत्येकांना अत्यंत प्रेमळपणाने जीवनातील आंतरिक परिवर्तनासाठी रोकडी प्रचिती देऊ करणारे संतसाहित्याचे अभ्यासक प. पू. श्रीसद्गुरू डॉ. गुरुनाथ विश्वनाथ मुंगळे यांच्या जीवनप्रवासात त्यांनी अनुभूती प्राप्त करताना घेतलेल्या प्रयासाचा प्रत्येक क्षण विलक्षण करणारा ग्रंथ अर्थात "ईश्वरेच्छा". प्रपंचामध्ये परमार्थ कसा आणावा, याचा ज्ञानकोश म्हणजे प. पू. श्रीसद्गुरू डॉ. गुरुनाथ विश्वनाथ मुंगळे महाराजांचे "ईश्वरेच्छा" हे चरित्र होय.**

नामाचे, ध्यानाचे, निस्सीम भक्तीचे, चिंतनाचे, भक्तीतील दृढतेचे, विकार आणि विकल्परहित विचारांचे, श्रीसद्गुरूंवरील विश्वासाचे, प्रेमळ नात्याचे, जीवनाच्या सत्य शोधनाचे, परमात्म्याच्या कृपेचे आणि ईश्वरी इच्छेचे महत्त्व अनुभवण्यासाठी श्रीमहाराज आयुष्यभर जीवनातील प्रवासात प्रयास करत आनंदी राहिले. नामाच्या, ध्यानाच्या आणि ईश्वरी इच्छेच्या महत्त्वाचे आणि महात्म्याचे त्यांनी जन्मभर स्वयं-अनुभूती प्राप्त झाल्यावरच ते पुरस्कृत केले. आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण नामाचे, ध्यानाचे, श्रीसद्गुरुंच्या कृपेचे आणि ईश्वरी इच्छेचे महत्त्व आणि महात्म्य सांगण्यातच त्यांनी त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाच्या जीवनातील प्रत्येक क्षण विलक्षण केले. ब्रह्मस्वरूपी विलीन झालेले प. पू. श्रीसद्गुरू डॉ. गुरुनाथ विश्वनाथ मुंगळे महाराज हे पूर्णत्वाप्रत पोहोचलेले, अध्यात्मिक उंची गाठलेले, अनेक संत, महाराज, अध्यात्मिक साक्षात्कारी विभूतींच्या सहवासाने, त्यांच्याबरोबर होत असलेल्या संवादाने प्रेरित होऊन स्वयं अध्यात्मिक अभ्यासातून यशस्वी ठरत राहिले. प्रपंचात राहून परमार्थ आणण्यासाठी आणि नामस्मरणाची, धारणेची आणि ध्यानाची महती सांगण्यासाठी त्यांच्या ओघवत्या वाणीतून प्रसवलेल्या प्रवचनाच्या प्रत्येक शब्दाला श्रीसद्गुरुंची, ईश्वरी इच्छेची जोड असल्यामुळेच ते गोड होत असल्याची अनुभूती प्रत्येकास येत असे. संपूर्ण ब्रम्हांडात चैतन्य निर्माण करणारे शब्द लालित्य म्हणजे श्रीसद्गुरूंची प्रवचने. भक्ताला हा अमृतानुभव घेण्यासाठी अगोदर लीन व्हावे लागते, तेव्हाच तो तल्लीन होऊ शकतो. नामाची गोडी आणि भगवंताची जोडी भक्ताला प्राप्त होते, तेव्हाच खरे तर तो केवळ जगण्यापलीकडचे जीवन अनुभवायला लागतो. नामाने बुद्धीही तरल होते आणि ही तरलता आत्मसाक्षात्कारालाही उपयोगी पडते. काळ, वेळ, वय अथवा परिस्थिती या कशाचेही बंधन नामाला नाही, असेही ते नमूद करतात. श्रीसद्गुरूंच्या जन्मापासून ते अध्यात्मिक कार्यापर्यंत अर्थातच साधकापासून ते श्रीसदगुरूंपर्यंतच्या जीवन प्रवासाचा अध्यात्मिक पातळीवर त्यांचा उंचावत गेलेला आलेख आपणास समजून घेण्यासाठी मार्गदर्शक ठरतो. आपल्या अंतरंगात डोकावणे, हे कदाचित प्रयास देणारी प्रक्रिया वाटेल, परंतू तो जीवनाचा प्रवास समजून करत राहण्याची आवश्यकता आहे. आपल्या अंतरात्म्याची ओळख त्या माध्यमातून होणे शक्य होऊ शकते. त्याला निश्चितच योगाभ्यासाची जोड द्यावी लागेल. जेणेकरून आपला अंतरात्म्याचा शोधा अधिक सुकर होऊ शकतो आणि आत्मनिर्भर होण्यासाठी तो अत्यंत जरुरीचा देखील असतो. ह्या विषयाकडे आपण योग आणि ध्यान ह्या अभ्यासातून अध्यात्माचा विचार करण्याची आवश्यकता



असते, "ईश्वरेच्छा" ह्या ग्रंथाच्या पठणामुळे आपल्याला त्यादृष्टीकोनातून मनपरिवर्तन आणि मतपरिवर्तन होण्यास मदत करते. अध्यात्मिकतेच्या मार्गावर प्रथम केवळ ग्रहस्थ असलेल्या साधकास मार्गस्थ होण्यासाठी सकारात्मक वैचारिक मंथनाच्या माध्यमातून "ईश्वरेच्छा" ह्या ग्रंथाच्या अध्ययनाव्दारे यशप्राप्तीच्या योग्य मार्गाचे दर्शन घडू शकते. प्रत्येक साधकाने साधना ही नेहमीच त्यांचे कर्तव्य समजून नित्यनेमाने, अंतर्मुख होऊन, आत्मभान जागरूक ठेवून, आत्मिक आनंदासाठी केली पाहिजे असे त्यांनी ह्या ग्रंथात नमूद केले आहे. त्यासाठी सर्वप्रथम आत्मनिष्ठ होणे जरुरीचे असते. आपल्या आत्मनिष्ठतेमुळे आपल्यात नवचैतन्य, नवी उमेद, नवा उत्साह आणि नवा जोश निर्माण होत असतो. आत्मविश्वास वाढीस लागण्याची सुरुवात ह्याच प्रकारे होत राहते. आत्मविश्वास आणि श्रीसद्गुरूंवरील विश्वासच केवळ आपला श्वास सुरु ठेवून आपणास आत्मनाभूती आणि आनंदानुभूती देत राहू शकतात. ही निरंतर प्रक्रिया असल्याचे विसरून चालणार नाही, हे ही "ईश्वरेच्छा" ह्या ग्रंथात त्यांनी निक्षून सांगितले आहे.

अध्यात्मिक प्रबोधनातून भक्तांना नामामृत आणि ज्ञानामृत पाजण्याचे काम श्रीमहाराजांसाठी नित्याचेच होते. श्रीमहाराजांनी स्वतः जन्मभर डोळ्यांनी नाम पाहिले, कानांनी नाम ऐकले, वाणीने नाम घेतले, मनाने नाम कल्पिले, बुद्धीने नाम चिंतिले आणि अंतरात्म्याला नामाच्या अनुभूतींची प्रचीती प्राप्त करून दिली. काया वाचा मनाने जगात एका नामाशिवाय त्यांनी दुसरे काहीच सत्य मानले नाही. त्याच्या फलदृपतेचे श्रेय स्वतःकडे न घेता, त्यांच्या जीवनात जे काही घडले, घडत आहे आणि घडणार आहे, ते सर्वकाही ईश्वरी इच्छाच आहे असेच ग्रंथातील प्रत्येक विषयात आणि आशयात स्पष्ट केले आहे.

देहबुद्धी मूळापासून जाळून टाकल्यामुळे त्यांच्या आचारात, विचारात, उच्चारात तसेच विचारांत, वर्तनात आणि व्यवहारांत चुकून देखिल मी पणा अथवा माझेपणा दिसत नाही. हेच त्यांच्या पूर्णत्वाचे गमक आणि संत असल्याचे मूळ लक्षण होय. अर्थात स्वतःबद्दल काहीच करायचे न उरल्यामुळे केवळ जीवनाचे, मनुष्य जन्म जगण्याच्या संधीचे सोने व्हावे, कल्याण व्हावे एवढीच त्यांची भावना होती. प्रपंचामध्ये परमार्थ कसा आणावा याचा ज्ञानकोश म्हणजे प्रेमाचा पाझर फुटणाऱ्या श्रीमहाराजांचे चरित्र होय. प्रापंचिकाच्या, साधकांच्या प्रत्येक अध्यात्मिक शंकेचे उत्तर त्यांच्या चरित्रात सापडते. अर्थात, सर्व उत्तरे म्हणजेच, श्रीमहाराजांनी स्वानुभूतिव्दारे शब्दांकित केलेल्या आणि स्वअध्ययनाव्दारे त्यांना प्राप्त झालेल्या प्रचीतीच आहेत. बालपणापासून वैदिक अनुष्ठानें, नामजप, भजनसप्ताह, संतांशी संवाद त्यांचा सहवास, श्रीगुरुचरित्राची पारायणे, तीर्थयात्रा स्वतः करून प्रपंचात राहून त्यांनी परमार्थाचा आनंद मिळवला.

भ्रमाच्या पलीकडे काय आहे, ते जाणावयाचे असेल तर देहाला आणि देहातील सर्व वृत्तींना मनाच्या सहाणेवर उगाळत ठेवून विविध वृत्तींच्या मेळातून निर्माण होणारे वृत्तीगंधरहित गंध मला समर्पित होऊन बाजूला होवो. समर्पणाची प्रक्रिया बोली भाषेत सोपी असली तरी त्यासाठी करावयास लागणारा अट्टाहास फारच मोठा असतो आणि अट्टाहासातून होणारी फलप्राप्ती त्या अव्यक्ताच्याच हातात असते. अशा स्वरूपातील स्वानुभूतिव्दारे त्यांना प्राप्त झालेल्या अनेक प्रचीती त्यांनी शब्दांकित केल्या आहेत. हा लेखनप्रपंच करण्याचे कारण कोणाला काही शिकवावे, काही सांगावे असे नसून, "ईश्वरेच्छा" हे बालपणापासून बरोबर असलेले पाथेय कसे कार्यरत होत असते याचेच प्रकटीकरण करावेसे वाटते, असे ग्रंथाच्या प्रारंभीच श्रीमहाराजांनी स्पष्ट केले आहे. तसेच ते पुढे असेही म्हणतात कि, मी काही साहित्यिक नाही, पण सुंदर साहित्याचा मी उपासक आहे. उपासकाला वारंवार आपली निष्ठा स्वतःच तपासावी लागते. ती निष्ठा निर्माण करण्याचे काम श्रीसद्गुरू महाराज करत असतात आणि साधकाच्या उपासनेचे सुनियोजन श्रीसद्गुरूकृपेनेच होत असते.

त्यांच्या वडिलांकडून घरात श्रीदत्त सेवा तर आईकडून श्रीज्ञानेश्वर माउलींची सेवा चालू असे. त्यांच्या दोन्हीही घराण्यात ईश्वरसेवेची आवड होती. अगदी बालवयात देवाच्या अस्तित्वाची एक वेगळी जाणीव त्यांना स्वप्नात झाली, बालवयातील तो निरागस आनंद पुढे साधनकाळात त्यांनी त्यामुळेच अनुभवला. त्यांनी बालपणात देखील देवाच्या दिव्याच्या मिणमिणत्या प्रकाशात आणि चिमणीच्या उजेडात काही स्तोत्रे म्हणण्याचा परिपाठही ठेवला होता. पण देवाने आपल्याला काही द्यावे ह्या अपेक्षा त्यांच्या अंतर्मनाला कधीही शिवल्या नाहीत, असेही ते सुरुवातीलाच स्पष्ट करतात. कोल्हापूर आणि शेणगाव येथे असताना त्यांचे बालपण, त्यादरम्यान झालेले शिक्षण संस्कार त्यांच्या पुढील अध्यात्मिक प्रवासात महत्वपूर्ण भूमिका बजावत राहिले.

परमार्थ हा चर्चेचा विषय नाही, तर तो प्रत्यक्ष अनुभूतीचाच विषय आहे, याची खुणगाठ जर मनाशी पक्की बांधली तर त्यातून साधकास प्राप्त होणारी शक्ती नुसती त्याला जागवत नाही, तर त्याचे जीवन सफल करण्यास मदत करत राहते, हे ह्या ग्रंथाच्या अध्ययनाने वाचकांना, साधकांना नीटपणे समजू शकते. अध्यात्म्याचा अंतःकरणातून पुरस्कार होऊ लागल्यावर प्रेमभावाची होणारी जागृती आपल्या अवतीभवती वावरणाऱ्या माणसातही बदल घडवून आणते; इतकेच नव्हे, तर विशेष प्रेमभाव प्राणिमात्रांच्या सहवासात जर प्रकट होत राहिला, तर त्यांच्यातही बदल झाल्याचे जाणवते.

ह्या ग्रंथात त्यांनी त्यांच्या अध्यात्मिक प्रयासात कोणकोणत्या विभूतींचे, संतांचे, महराजांचे, तत्वज्ञानी व्यक्तींचे मार्दर्शन लाभले तसेच ह्या प्रवासात साधक परिवारातील कोणकोणत्या व्यक्तींची साथ-सोबत मिळाली त्यांचाही आवर्जून नामोल्लेख केला आहे. त्यासाठी त्या सर्वांचे त्यांनी आभार देखील मानले आहेत. जीवनातील विविध प्रकारचे चांगले-वाईट अनुभव, सुख-दुःख याबाबत देखील त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यांच्या बौद्धिक गृहितकांना जे पटले ते त्यांनी स्वीकारले आणि न पटलेल्या बाबींकडे, मतांकडे, विचारांकडे दुर्लक्ष केले. विचारांमध्ये विकल्प निर्माण करणाऱ्या विकारात अडकून न राहता त्यांच्या श्रीसद्गुरुप्राप्तीच्या संकल्प पूर्तीसाठी ते सदैव प्रयोगशील, प्रयत्नशील, चिंतनशील राहिले.

एक सामान्य साधक ते असामान्यत्व प्राप्त झालेल्या श्रीसद्गुरूपर्यंतची जीवनगाथा लिहिताना "ईश्वरेच्छा" च्या माध्यमातून त्यांनी स्वतःला सतत एक सामान्य साधकच समजून घेतले, कधीही श्रीसद्गुरुंचे स्थान प्राप्त झाल्याचे भासवले अथवा स्वतःला मिरवले नाही. ते प्रसिद्धीपासून सदैव दूरच रहात आले. तसेच त्यांच्या संपर्कात येणाऱ्या साधकांशी मैत्रीपूर्ण नाते जपले, त्यानाही कधी त्यांचे शिष्य समजले नाही. ह्याही सर्व बाबींना ते, ही केवळ "ईश्वरेच्छा" असल्याचेच म्हणत आले. अध्यात्मिक अनुभूती घेण्यासाठी "ईश्वरेच्छा" हा ग्रंथ प्रत्येकाने एकदा तरी अध्ययनाच्या दृष्टीने वाचावा आणि शक्य झाल्यास आपल्या ग्रंथसंपदेत समाविष्ट करावा.

# अटकळी परिसरातील शेतकऱ्यांनी केली धण्याची लागवड

आधुनिक केसरी न्यूज

**ज्ञानेश्वर शिरगिरे**

**बिलोली :** तालुक्यातील अटकळी येथील बागायतदार शेतकऱ्यांनी  हरभरा, करडई, ज्वारी या कोरडवाहू पिकावर भर न देता, यावर्षी शाहापुर परिसरातील जवळपास ४० टक्के शेतकऱ्यांनी धन्याची लागवड केली आहे. धन्याच्या पिकाच्या लागवडीचा खर्च हा इतर बागायती पिकापेक्षा कमी असल्याने व उत्पन्न जास्त निघत असल्याने तसेच उत्पन्न निघत असलेल्या धन्याला बाजार भाव हे बऱ्यापैकी मिळत असल्याने यावेळी अटकळी परिसरातील बागायतदार शेतकऱ्यांनी धन्याचे पिक लागवड करण्यावर जोर दिला आहे. तसेच मागच्या वर्षी धन्य या उत्पन्नाला एका क्लिंटनला १०  ते ११ हजार रुपये बाजार भाव मिळाल्यामुळे व त्या तुलनेत येणारा लागवडी खर्च कमी असल्याने येथील बागायतदार शेतकऱ्यांनी धन्याचे पिकाची लागवड करण्याचे निर्णय घेत सर्वाधिक धन्याचे पिकाची लागवड केली आहे. धन्याचे उत्पन्न निघाल्यानंतर निघालेल्या उत्पन्नाला किती बाजार भाव मिळतो? यावर शेतकऱ्यांना नफा तोटा काढता येणार आहे. परंतु सद्यस्थितीत परिसरात सर्वत्र धन्याचे पिंकाचे सुगंध  दरवळत व पांढऱ्या शुभ्र फुलाच्या चादरीने पांघरन घातल्या सारखे हे धन्याचे पीक बहरलेले दिसून येत आहे.



अटकळी परिसरातील बहुतांश बागायतदार शेतकऱ्यांनी यावेळी धान्य पिकाची लागवड करत धान्य पिकावर जोर दिला आहे . मागील वर्षी माझ्यासह येथील सात ते आठ मोजक्याच बागातदार शेतकऱ्यांनी कमी खर्चात धान्य पिकाची लागवड करत हेक्टरी १७ ते १८ क्विल्टन एवढे उत्पन्न काढले असल्याने हरभरा ज्वारी पिकापेक्षा थोडा जास्तीचा फायदा झाले असल्याने यावेळी परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांनी धन्याची लागवड केलेली आहे . **बजरंग बत्तलवाड ( सोसायटी चेअरमन ) बागायतदार शेतकरी अटकळी**

# थोडेसे मायबापसाठी योजनेंतर्गत वयोवृद्धांना शालीचे वाटप



आधुनिक केसरी न्यूज

**बाजारसावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत थोडेसे मायबाप साठी ग्राम निधीतुन सद्या थंडी बघता गरम उब  मिळावी यासाठी ६०वर्षिय वयोवृद्धांना (दि.२२) शॉलचे वाटप करण्यात आले. सरपंच आप्पाराव नलावडे उपसरपंच कारभारी नलावडे ग्रामपंचायत सदस्य शोभाताई भिमराव नलावडे कल्याण काटकर पोपट काटकर बबन पुंड माजी सरपंच भिमराव देवराव नलावडे माजी ग्रा पं सदस्य चांदखान पठाण जैस्वाल भैय्या ग्रामविकास अधिकारी एबी बनसोड यांच्या उपस्थितीत व हस्ते वयोवृद्ध महिलांना ( दि.२२)शॉल ची वाटप करण्यात आली.

हिवाळा तथा थंडी बघता शॉल मिळाल्याने वयोवृद्धांनी ग्रामपंचायत चे कौतुक केले. यावेळी ग्रामपंचायत कार्यालय कर्मचारी बबन नलावडे बंडु नलावडे गणेश नलावडे बबन शेषराव शुभम चव्हाणसह मोठ्या संख्येने वयोवृद्ध महिलांची उपस्थित होते.

# अखेर डोणगावकरांचा रस्ता होणार सुकर, रस्त्याच्या कामाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन,धामोरी, डोणगाव, रायपूर, पिंपळगाव (दिवशी) रस्त्याच्या कामाला अखेर सुरुवात करण्यात आली असून अखेर डोणगावकरांचा रस्ता तब्बल २५ वर्षानंतर सुकर होणार असल्याने दैनिक आधुनिक केसरीने याबाबत वृत्त पावसाळ्यात वेळोवेळी प्रसारित केले होते. त्यामुळे दैनिक आधुनिक केसरीचे प्रवास्यांनी  आभार मानले आहे.

दरम्यान शेतकरी नेते महेश गुजर यानी सांगितले की सन २०१८-१९ साली पिंपळगाव डोणगाव लासुर रस्त्याचे काम ४ कोटी रूपये खर्च करून चांगले काम झाले होते. परंतु स्थानिक बांधकाम विभागाच्या प्रशासनाच्या दुर्लक्षे मुळे समृद्धी महामार्ग कामाच्या अवजड वाहनामुळे ४ कोटी वाया गेले असताना समृद्धी ठेकेदारांकडुन पिंपळगाव डोणगाव लासुर स्टेशन रस्त्याचे काम करून घेणे अपेक्षित होते. परंतु जाणीवपूर्वक बांधकाम विभाग पश्चिम यांनी समृद्धी महामार्ग पुर्णे होण्यापूर्वी २ वर्षापूर्वी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन सुद्धा काम होत नसल्याने वेळोवेळी तक्रारी केल्यानंतर आता काम सुरू झाले आहे. रस्त्याच्या कामासाठी ठरवुन दिलेली गुणवत्ता, मापके ठेकेदारांनी पाळावी नसता वरिष्ठ बांधकाम विभागात तक्रार करण्यात येईल .
जर ठेकेदारांनी काम चांगले केले तर परिसरातील नागरिकांतर्फे सत्कार करण्यात येईल असेही इंजी. महेशभाई गुजर यानी दै. केसरीशी बोलतांना केले.



गेल्या कित्येक वर्षांपासून डोणगावकरांसह पिपंळगाव, रायपूर येथील जनतेला व्यापारी बाजारपेठ असणाऱ्या लासूर स्टेशन येथे जाण्यासाठी खड्ड्यातून प्रवास करावा लागत होता त्यात पावसाळ्यात तर अतीत्रास शालेय विद्यार्थ्यांना सहन करावा लागत होता त्यामुळे केवळ रस्त्यामूळे शालेय विद्यार्थ्यांचे भावित्व्य धोक्यात आले होते मात्र दैनिक आधुनिक केसरीने या रस्त्याच्या दुरवस्थेच्या बातम्या प्रकाशित केल्याने पावसाला संपताच रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली असून रस्त्याच्या काम तीस वर्ष्यानंतर चालू होत असल्याने सामाजिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी उत्कृष्ठ काम करण्याकडे लक्ष द्यावे नसता पुन्हा ये रें माझ्या मागल्या सारखी परिस्थिती ओढवली तर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल .
**आबासाहेब डोणगावकर ( नागरिक, डोणगाव )**

# इंजेगाव जि.प.शाळेत वॉटर फिल्टर बसवणार : सरपंच विद्या कराड

आधुनिक केसरी न्यूज

**परळी वैजनाथ :**  तालुक्यातील इंजेगाव ग्रामपंचायत निवडणुकीत नुकतेच सरपंचपदी विराजमान झालेले सौ. विद्या अमोल कराड यांनी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस भेट दिली. यावेळी त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

शाळेत भेट देऊन सौ. विद्या अमोल कराड यांनी शाळेतील अडीअडचणी समजून घेतल्या. समस्या जाणून घेतल्या.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी त्यांचा सत्कार केला. शाळेतील समस्या कोणतीही असो ती तर सोडवणारच गावातील मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करणार असे सांगून पिण्याच्या पाण्यासाठी एक महिन्याच्या आत बोअर घेऊन फिल्टर बसविण्यात येणार असल्याचेही सरपंच सौ. विद्या अमोल कराड यांनी सांगितले.



**बचत गटांचे प्रश्न प्रधान्याने सोडवू :** तालुक्यातील इंजेगाव ग्रामपंचायत निवडणुकीत नुकतेच सरपंचपदी विराजमान झालेले सौ . विद्या अमोल कराड यांनी आज गुरुवार दि .22 डिसेंबर पासून कामाला सुरुवात केली . गावातील सर्व महिला बचत गटांना भेट दिली असता त्याचा सत्कार करण्यात आला . तसेच बचत गटांच्या कोणताही प्रश्न असो किंवा अडचणी सोडवू तसेच त्याचे प्रशन ही जाणून घेतल्या बचत गटाच्या ग्राम संघाच्या ऑफिसला 15 दिवसाच्या आता लाईट फिटिंग व दरवाजे खिडक्यांची दुरुस्ती व विविध प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी कटीबधद असल्याचे नवनिर्वाचित सरपंच सौ .विद्या अमोल कराड यांनी सांगितले .

# सिल्लोडमधे कृषीमंत्री सत्तार यांचे वर्चस्व कायम; जि.प. सदस्य गोपीचंद जाधव

आधुनिक केसरी न्यूज



**सिल्लोड :** तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी झालेल्या निवडणुकीत कृषिमंत्री अब्दुल सत्तारांचाच वरचष्मा असल्याचे सिद्ध झाले आहे. १८ पैकी १३ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी शिंदे गटाने भगवा फडकवला. तर भाजपाला ५ जागांवर समाधान मानावे लागले. सिल्लोड तालुक्यातील १८ गावांच्या ग्रामपंचायतींची मतमोजणी मंगळवारी पार पडली. या निवडणुकीत मतदार उत्स्फूर्तपणे मतदानासाठी बाहेर पडल्याने मतदानाची टक्केवारी विक्रमी राहिली. निवडून आलेल्या उमेदवार व समर्थकांनी मनसोक्तपणे गुलालाची उधळण व फटाक्यांच्या आतिषबाजीत घोषणाबाजी करून विजयोत्सव करण्यात साजरा आला.अशी माहिती जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना सांगितले.या निवडणुकीत १८ गावात बाळासाहेबांची शिवसेना कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांची होती. अब्दुल सत्तार यांच्या समर्थकांचा दोन्ही पॅनलने विरोधकांचा धुव्वा उडवला. त्यामुळे दावेदारांचे गणित बिघडले आहे. निकालानंतर कृषिमंत्री सत्तार यांच्या कार्यालयासमोर जल्लोष साजरा करण्यात आला. निवडणुकीत १८ पैकी १३ ग्रामपंचायतीवर बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे कृषिमंत्री सत्तार यांनी निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अर्जुन गाढे, केशवराव तायडे, बाळासाहेबांची शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख किशोर दुर्गाबाई पवार, नॅशनल सुत गिरणीचे संचालक अब्दुल आमेर, राजेंद्र ठोंबरे, आसिफ बागवान, शेख बबलू, ताठे, धैर्यशील तायडे आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकत्यांची उपस्थिती




# जयंत पाटलांच्या निलंबनाविरोधात राष्ट्रवादीचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या विधानसभेतील निलंबनामुळे सरकारच्या विरोधात घोषणा देऊन आंदोलन करण्यात आले.

नागपूर येथे विधानसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे . विधानसभेच्या अधिवेशन दरम्यान काही कारण नसताना भाजप शिंदे सरकारने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आदरणीय श्री जयंतराव पाटील साहेब यांना निलंबित केले कारण नसताना निलंबन करणे हे लोकशाहीचा गळा घोटण्यासारखे आहे असे या निवेदनात म्हटले जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीला विधानसभेमध्ये आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे . म्हणजेच जयंतराव पाटील यांचे निलंबन करून भाजप शिंदे सरकारने एक प्रकारे लोकशाही ऐवजी हुकूमशाही सुरू केलेली आहे. जनतेचे विहित मुद्द्यावरील ध्यान भरकटण्यासाठी हे निलंबन करण्यात आले आहे. सदर निलंबन त्वरित मागे घ्यावे अशी धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मागणी केलेली आहे. यावेळेस कार्यकर्त्यांनी आंदोलन करून घोषणाबाजी करून भाजप व शिंदे सरकारचा निषेध व्यक्त केला. यावेळेस मोठ्या संख्येने धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी धुळे ग्रामीणचे जिल्हा अध्यक्ष सुरेश सोनवणे, शहर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले, दिनेश मोरे, राजू चौधरी, कुणाल पवार, दिनेश मोरे, रामेश्वर साबळे, महेंद्र शिरसाट, राजेंद्र चितोडकर, मंगेश जगताप, दिपक देसले, बिका नेरकर, सरोजनीताई कदम, उमेश महाले, स्वामिनी पारखे, कुणाल पवार, राजू चौधरी, रामेश्वर साबळे, राजेंद्र चितोडकर, दिपक देसले, संजय माळी, सतिष नाना पाटील, युवराज बागूल, हाजी हाशिम कुरेशी, असलम खाटिक, दिलीप पाटील, शरीप पटेल, कल्पेश मगर, निर्मला शिंदे, वंदना केदार, मयूर देवरे, उमेश महाजन, भूषन पाटील, गोरख शर्मा, वाल्मीक मराठे, मंगेश तात्या जगताप, चितोडकर नाना, किरण शिंदे, यंशवत डोमाडे, रईस काझी, रईस शेख, दिपक देवरे, राजेंद्र पाटील, विजय वाघ, डॉमणिक मलबारी, समद शेख, सलिम खाटिक, मसूद अन्सारी, अतुल जाधव, नजिर शेख, किरण लाई, अन्सारी, बजाज शेवा, दत्तू पाथिका, गोलू नागमल, विशाल केदार आदी उपस्थित होते.





## शिरेसायगाव ग्रामपंचायतवर जनसेवा ग्रामविकास पॅनलचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**शिरेसायगाव :** ग्रुप ग्रामपंचायत निवडणूक गुरूवारी (दि.18) झाली. या निवडणुकीत शेतकरी लोकशाही ग्रामविकास पॅनलचा धुवा उडवत 10 जागा पैकी सरपंच सहित 6 जागेवर दनदनित विजय मिळवला. पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग जगताप तसेच माजी सरपंच लक्ष्मणराव तांबे व दादासाहेब गरुड विरोधात लासूर स्टेशन कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती दादासाहेब जगताप माजी सरपंच अशोक जगताप विद्यमान सोसायटी चेअरमन गोरखनाथ नेमाने व माजी मार्केट कमिटी संचालक गिरजीनाथ जगताप यांच्या पॅनलमध्ये निवडणूक रंगली होती. मंगळवार शिरेसायगाव येथे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. 1570 पैकी 1260 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या मध्ये सरपंच पदासाठी ओ.बी.सी.माहीला राखीव मतदारसंघ होता चंद्रकला दादासाहेब गरुड या सुतार सामाजाच्या होत्या. विरोधात लढणाऱ्या हिराबाई गोपीनाथ नेमाने या मराठा समाजाच्या होत्या. त्या ओबीसी कार्ड वरती निवडणूक लढल्या तसेच ज्योती शिवाजी गायकवाड व जिजाबाई नंदू यशवंत या अपक्ष म्हणून रिंगणात होत्या.यामध्ये बाजी मारत चंद्रकला दादासाहेब गरुड यांनी विजय मिळवला. पुढीलप्रमाणे, उमेदवार सर्व साधारण पुरुष शरद दिलीप जगताप सर्वसाधारण महिला उमेदवार जिजाबाई नारायण जगताप, शांता रोहिदास जगताप, सोनाली कल्याण आवारे, बेबी अकबर शेख या सर्व उमेदवाराचे अभिनंदन करण्यासाठी माजी सरपंच सुदाम जगताप, राधाकिसन जगताप, रघुनात जगताप, सुखदेव् काका जगताप गनेश जगताप, दिलीप जगताप, सुखदेव आल्हाड, कचरू नेमाने, संजू नेमाने, ज्ञानेश्वर जगताप, जगताप, गोरखनाथ जगताप,पंढरीनाथ नेमाने, लक्ष्मण जगताप, दिगंबर जगताप, सोपान जगताप, कल्याण तांबे, विश्वनाथ म्हैसमाळे, वामन जगताप, पुंजाराम जगताप, सदाशिव जगताप, रामेश्वर तांबे, योगेश जगताप, गजानन जगताप, कैलास गायकवाड, बंडू गायकवाड, सोमा गायकवाड, एकनाथ पवार, सचिन पवार, पांडुरंग भालेराव, सतीश जगताप, उद्धव जगताप, दादासाहेब जगताप, साईनाथ जगताप, वाल्मीक जगताप,यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

## ज्ञानेश्वर शिरगीरे यांची भारतीय मानव अधिकार परिषद बिलोली तालुकाध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**बिलोली :** भारतीय मानव अधिकार परिषद तालुका अध्यक्षपदी ज्ञानेश्वर शिरगीरे यांची सर्वानुमतेनिवड करण्यात आली भारतीय मानव अधिकार आयोग ची स्थापना 12 ऑक्टोबर रोजी मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 च्या कायद्या अंतर्गत करण्यात आली आहे.

सदर संघटना राष्ट्रीय पातळीवर मानले जाते म्हणून त्या अनुषंगाने सामाजीक क्षेत्रात चांगली ओळख निर्माण करनारे तथा पत्रकार क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन भारतीय मानव अधिकार परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष एस के शर्मा यांच्या नेतृत्वाखाली बैठक घेऊन नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात भारतीय मानव अधिकार परिषद तालुका अध्यक्षपदी ज्ञानेश्वर शिरगीरे यांची नियुक्ती पत्र देऊन जबाबदारी सोपवली आहे या नीवडीचे बिलोली तालुक्यातील सामाजिक वर्ग पत्रकार वर्ग या नीवडीचे सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## गणितोत्सव दिनानिमित्त देवरे विद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** तालुक्यातील श्री आप्पासो. आत्माराम धवळू देवरे माध्यमिक विद्यालय विखरण येथे राष्ट्रीय गणित दिवसानिमित्त गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गणितीय कोडी, गणितीय सुत्रे, गणितीय उखाणे, तालबद्ध पाढे, गणितज्ञांच्या रंजक गोष्टी, कविता, बौद्धिक कोडी, चित्रकला, रांगोळी, आपल्या वर्गाचे फलक लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आल्यात. चित्रकला स्पर्धेत लहान गटात प्रथम कु.गायत्री लोहार, द्वितीय तेजस्विनी पाटील तृतीय सुवर्णा पाटील उत्तेजनार्थ चि.दर्शन पाटील यांनी तर मोठ्या गटातून प्रथम कु.भाग्यश्री पाटील, द्वितीय चि.महेश पाटील, तृतीय क्रमांक वैभवी पाटील तर कु.नेहा पाटील उत्तेजनार्थ बक्षिसाची मानकरी ठरली.गणितिय गोष्टींच्या स्पर्धेत प्रथम चि.तेजस पाटील, द्वितीय सपना मराठे तसेच गणितीय कोडीमध्ये कु.खुशबू पाटील व कु.साक्षी पाटील तर रांगोळी स्पर्धेत प्रथम कु.मानसी पाटील व गट, द्वितीय क्रमांक देवर्षी पाटील व गट तृतीय कु.चेतना पाटील, जयश्री भील व तसेच फलक लेखन स्पर्धेत प्रथम मनिष पाटील, हर्षल पाटील व गट द्वितीय वैभवी व भाग्यश्री पाटील व गट तृतीय दिपेश लोहार व राज मराठे यांनी पारितोषिक मिळवले.कार्यक्रमाचे



अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.डी.साळुंके, तसेच कार्यक्रमाचे व्याख्याते गणित शिक्षक एम.डी.नेरकर यांनी मार्गदर्शन केले.



## तर मनपा आयुक्तांच्या बंगल्यासमोर हातगाड्या लावणार; शहीद भगतसिंग हॉकर्स युनियन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मनपा आयुक्त अभिजीत चौधरी हे मनपामध्ये कायम अनुपस्थित रहातात, उद्या शुक्रवारी 4 वाजता ते नागरीकांना भेटतात असे उपायुक्त भालचंद्र नेमाणे यांनी सांगीतल्याने पुन्हा उद्या 4 वाजता सर्व पथविक्रेते आयुक्तांच्या दालनात उपस्थित राहणार आहेत, ते अनुपस्थित राहीले कींवा पथविक्रेत्यांचा प्रश्न न सोडवल्यास केव्हाही आयुक्तांच्या बंगल्यासमोर हातगाड्या लावुत असा निर्वाणीचा इशारा आयटक व नॅशनल हॉकर्स फेडरेशन संलग्न शहीद भगतसिंग हॉकर्स युनियनने दिला आहेयाबाबत असे की, पथविक्रेता उपजीवीका संरक्षण व विनिमयन कायदा २०१४ अंतर्गत पथविक्रेत्यांच्या संरक्षणाची जबाबदारी म.न.पा. प्रशासक / आयुक्त यांची अस्थाई शहर पथविक्रेता समितीचा अध्यक्ष या नात्याने आहे. काही-काही दिवसांच्या अंतराने म.न.पा. अतिक्रमण विभागाचे पथक कायद्याचे उल्लंघन करून पथविक्रेत्यांवर हल्ले करीत आहे. आम्ही कायद्याला मानत नाही, असे खूलेआम म्हणत आहेत. या हल्ल्यांविरोधात आज पुन्हा शहीद भगतसिंग हॉकर्स युनियन तर्फे मनपा टाऊन हॉल कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आले. यावेळी रस्ता छोडेंगे नही फुटपाथ छोडेंगे नही, रोजी रोटी छोडेंगे नही लडाई छोडेगे नही, हप्ते घेणे बंद करा, हातगाडी वाल्यांचा पैसा मनपा तिजोरीत आलाच पाहीजे, कायदा मोडुन हल्ले करणार्या अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांना निलंबित,करा इ घोषणांनी मनपा कार्यालय दणाणून गेले. यावेळी ऍड. कॉ. अभय टाकसाळ, शे. ईसाक, अभिषेक बनकर, संजय जाधव, राजु हिवराळे, पूनम बनकर, सुशांत अडकमोल, वाल्मिक सोनवणे, संतोष घुगे, नंदा घुगे, मंगल सोनवणे, संजय गायकवाड़ यांच्यासह मोठ्या संख्येने पथविक्रेते उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# वेळा अमावास्येनिमित्त 'वनभोजन'सोबत वृक्षारोपण ! 'वसुंधरा' प्रतिष्ठानचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** लातूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी वेळा अमावस्या हा ग्रामीण संस्कृतीला जपणारा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शुक्रवारी शेतात वनभोजन करण्यात आला. या अनुषंगाने वसुंधरा प्रतिष्ठानच्या पुढाकाराने 'वनभोजन आणि वृक्षारोपण' या अभिनव उपक्रम राबवून अनेक ठिकाणी शेतात वृक्षारोपण करण्यात आले. या माध्यमातून वृक्षांची लागवड आणि संवर्धन करणे काळाची गरज आहे हा संदेश देऊन शेतात फळांच्या झाडांची लागवड करण्यात आली. वसुंधरा प्रतिष्ठानच्या या उपक्रमाला मोठा प्रतिसाद देत अनेकांनी ही वेळा अमावस्या वृक्षारोपण करून साजरी केली. वेळा अमावस्या हा सण शुक्रवारी लातूर जिल्ह्यातील अनेक तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने ज्यांना शेती नाही असे नागरिक आपले नातेवाईक, मित्र यांच्या शेतात जाऊन वनभोजन करतात. या अनुषंगाने वसुंधरा प्रतिष्ठानच्या पुढाकाराने गेल्या 7 वर्षांपासून वेळा अमावस्या निमित्ताने वनभोजन सोबतच वृक्षारोपण ही मोहीम राबविली जात आहे. यावर्षीही ही मोहीम मोठ्या उत्साहात राबविण्यात आली असून, अनेक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. वसुंधरा प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्य ज्यांच्या शेतात वनभोजन करण्यासाठी गेले जाताना 2 फळांची झाडे सोबत घेऊन जाण्यात आली. सदरील झाडे शेतात लावून शेतकरी मित्राने ती झाडे जगवावी अशी विनंती करण्यात आली. याला शेतकरी बांधवांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लातूर जिल्ह्यात वनांचे क्षेत्र वाढावे यासाठी वसुंधरा प्रतिष्ठानतर्फे प्रत्येक सण, उत्सव, सोहळे याला पर्यावरणाची जोड देण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून वेळा अमावस्या निमित्ताने हा उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून झाडे लावू आणि ती जगवू असा संदेश देण्यात आला. गेल्या 8 दिवसांपासून या उपक्रमाची तयारी सुरू होती. नागरिकांनीही हा उपक्रम राबवावा अशी विनंती समाज माध्यमांतून करण्यात आली, याला उदंड प्रतिसाद मिळाला असून अनेकांनी आपल्या आणि मित्रांच्या शेतात या निमित्ताने वृक्षारोपण करून ही वेळा अमावस्या आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरी केली. लातूर तालुक्यातील हरवाडी येथे वसुंधरा प्रतिष्ठानचे सदस्य उमेश ब्याकुडे यांच्या शेतात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.योगेश शर्मा, कार्यकारिणी अध्यक्ष डॉ.अजित चिखलीकर, सदस्य उमेश ब्याकुडे यांच्यासह परिवारातील सदस्य, शेतकरी उपस्थित होते. याशिवाय औसा तालुक्यातील आलमला येथे स्वामी यांच्या शेतात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वसुंधरा प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अमोलआप्पा स्वामी, सन्मुखप्पा स्वामी, विरभद्र स्वामी, राजकुमार स्वामी, मन्मथ स्वामी, महादेव स्वामी, सोहम स्वामी, शरण लकडे, मंदाकिनी स्वामी, दैवाशाला स्वामी आदींची उपस्थिती होती.



लातूर जिल्ह्यातील वनांचे क्षेत्र वाढावे यासाठी वसुंधरा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था गेल्या सात वर्षांपासून कुठल्याही मदतीशिवाय स्व खर्चाने काम करीत आहे . वसुंधरा प्रतिष्ठानचा प्रत्येक सदस्य महिन्याला 300 रुपये पर्यावरण कार्यासाठी स्वत :हून देतात . या जमा रकमेतून वृक्षारोपण आणि संवर्धन केले जाते . वेळा अमावस्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला असून, सर्वच स्तरातून या उपक्रमाचे स्वागत होते आहे, अशी माहिती वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा .योगेश शर्मा यांनी दिली .

# काजल भाकरेला सुवर्णपदक

## आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेल्या स्पर्धेत 'गोल्डन गर्ल'म्हणून मिळविला नावलौकिक

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयाची बी.व्होक. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी काजल भाकरे हिने न्युझीलंड येथे झालेल्या पॉवर लिफ्टिंग कॉमनवेल्थ स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले आहे. शिवाय, गोल्डन गर्ल म्हणूनही नावलौकिक प्राप्त केला आहे. ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा नुकतीच न्युझीलंड येथे पार पडली. यात काजल भाकरे हिने मोठे यश मिळवून दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे नाव सातासमुद्रापार नेले आहे. 47 किलो वजन गटात तिने हे सुवर्णपदक प्राप्त केले आहे. काजलला क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नितेश स्वामी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.नितेश स्वामी, आयक्युएसी समन्वयक डॉ.बालाजी कांबळे, बी.व्होक. अभ्यासक्रम समन्वयक डॉ.विशाल वर्मा आदींनी अभिनंदन केले आहे.



# ३१ डिसेंबरपर्यंत दौलताबाद किल्ला परिसरातील अतिक्रमणे हटवण्याचे आदेश

## जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांनी केली संयुक्त पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दौलताबाद किल्ला परिसरातील अतिक्रमण धारकांनी 31 डिसेंबरपर्यंत स्वतः हून अतिक्रमणे काढून घ्यावीत नसता त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पाण्डेय यांनी दिले. शहरात होणाऱ्या G-20 परिषदेच्या अनुशगने जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पाण्डेय, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी आणि पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी बिबी का मकबरा परिसर, दौलताबाद किल्ला आणि वेरूळ लेणी परिसरातील अतिक्रमणाची पाहणी करून लवकरात लवकर अतिक्रमण काढण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना दिले. वेरूळ लेणी परिसरातील अतिक्रमण काढून त्यांना पर्यायी जागा देण्याबाबत नियोजन करावे, येथील MTDC च्या मालकीच्या असणाऱ्या पार्किंगमध्ये वाहने लावण्याचे नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. यावेळी वेरूळ येथून जाणाऱ्या बायपासच्य जागेची देखील जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी पाहणी करून स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.





# महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटना औरंगाबाद जिल्हा संघटकपदी ज्ञानेश्वर दांडेकर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** गुरूवारी झालेल्या संगणक परिचालक संघटनेच्या बैठकीत जिल्हा अध्यक्ष विजय वाघ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा संघटक म्हणून खुलताबाद तालुक्यातील ज्ञानेश्वर पाटील दांडेकर यांची जिल्हा संघटक पदी नियुक्ति करण्यात आली. तसेच यावेळी येणाऱ्या 27 तारखेच्या मोर्चा संदर्भात नियोजन करण्यात आले. यावेळी गंगापूर तालुकाध्यक्ष दत्ता ठोंबरे, औरंगाबाद तालुकाध्यक्ष राहुल वाघ, सिल्लोड तालुकाध्यक्ष सद्दाम मुलतानी, खुलताबाद तालुकाध्यक्ष प्रल्हाद आहेवाड, औरंगाबाद तालुका उपाध्यक्ष परमेश्वर अंभोरे, किरण भाऊ, संतोष भाऊ, वैजापूर तालुका सदस्य आण्णासाहेब जाधव, पैठण तालुका सदस्य मुस्ताक शेख आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व संगणक परिचालक यांना होणाऱ्या मोर्चात सहभागी होण्याचे आव्हान करण्यात आले.

# द्रोणागिरीत रंगले काव्यसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**रायगड :** द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन आयोजित 22 वा युवा महोत्सव आयोजित काव्यसंमेलन दिनांक 21 डिसेंबर 2022 या दिवशी पार पडला. या कार्यक्रमासाठी आमंत्रित कवी म्हणून महाराष्ट्र साहित्य क्षेत्रातील अनेक दिग्गज तसेच नवोदित साहित्यिकांना आमंत्रित केले गेले. या कविसंमेलनाचे अध्यक्ष स्थान माननीय श्री. महादेव घरत साहेब यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून उरणचे माजी आमदार सन्माननीय श्री. मनोहर शेठ भोईर साहेब हे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण म्हात्रे सर यांनी केले. हा भव्यदिव्य कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्यांनी अथक प्रयत्न केले ते म्हणजेच भ.पो.म्हात्रे सर, संजय होळकर सर, मिनल माळी मॅडम, सुचित्रा कुंचमवार मॅडम आणि हेमाली म्हात्रे -पाटील मॅडम या कार्यकारी मंडळाचे फार मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी पासून ते समाप्तीपर्यंत सर्व आयोजन फार अप्रतिम होते. कार्यकारी मंडळाचे समन्वय देखील खूप छान होते. सर्व साहित्यिक सारस्वतांनी अप्रतिम रचना सादर केल्या. त्यानंतर त्यांचा सन्मान करण्यासाठी त्यांना स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, पुष्पगुच्छ आणि सप्रेम भेट देऊन गौरविण्यात आले. विशेष सांगायचे झाल्यास या काव्यसंमेलनात विविध प्रकारच्या आणि भिन्न-भिन्न विषयांवर आधारित काव्यरचनांचा आस्वाद घेण्याचा लाभ सर्व साहित्यिकांना आणि श्रोत्यांना मिळाला.





# पहा 'त्या' परदेशी पाहुण्यांचा तोरा, पार करती हरभरा

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** सध्या ऋतू बदलामुळे देशात गुलाबी थंडी पडत आहे. यामुळे साहजिकच हे हवामान ज्या पक्ष्यांना पोषक आहे. ते पक्षी अनेक देशांच्या सिमा पार करित भारतात स्थलांतरीत झाले आहेत. धर्माबाद मध्येही दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा पट्टकादंब/राजहंस म्हणजेच बार हेडेड गुज हे रशिया, मंगोलिया व कजाकिस्तान या देशातून भारतात पाहुणे म्हणून आले आहेत. फेब्रुवारीच्याच्या अखेरीस किंवा मार्च महिन्याच्या सुरुवातीस हे पक्षी परत आपल्या मायदेशी जातील. हे पक्षी शक्यतो तलावाच्या उथळ पाण्यातील कोवळे गवत खातात असे मत पक्षी अभ्यासकांचे मत आहे.

परंतु आता यांना हरभऱ्याचे हिरवीगार कोवळी पाने आवडायला लागली आहेत. त्यामुळे या पाहुण्यांनी आपले बस्तान हरभऱ्यांच्या शेतात मांडले आहे. साहजिकच त्यांना हाकलून देताना शेतकरी हवालदिल झालेला आहे. हजारोंच्या संख्येत हे पक्षी धर्माबाद तालुक्यात वास्तव्यास आलेले असल्यामुळे धर्माबाद व परिसर जैवविविधतेसाठी अनुकूल असल्याचे पहावयास मिळते आहे."पहा त्या परदेशी पाहुण्यांचा तोरा,पार करित आहेत हरभरा" अशीच म्हणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

# विलासराव देशमुख अभय योजनेचा लाभ घेण्याची ३१ पर्यंत मुदत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरात वीजबिलांच्या थकबाकीपोटी कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांकडील वीजपुरवठ्याच्या पुनरुज्जीवनासाठी सोयगाव महावितरणने सुरू केलेल्या विलासराव देशमुख अभय योजनेचा लाभ घेण्याची संधी 31 डिसेंबर 2022 पर्यंत उपलब्ध आहे. योजनेत परगुती ग्राहकांसोबतच व्यवसाय आणि उद्योगांना पुनरुज्जीवनाची संधी मिळून राज्यातील अर्थकारणाला गती मिळणार आहे. या योजनेनुसार थकबाकीची मूळ रक्कम हप्तेवारीने अथवा एकरकमी भरल्यास त्यावरील व्याज आणि विलंब आकार पूर्णतः माफ करण्यात येत आहे. 31 डिसेंबर 2021 रोजी किंवा त्यापूर्वी बाकीपोटी कायमचा बीजपुरवठा खंडित केलेले सर्व बिगर कृषी उच्चदाब आणि लघुदाब ग्राहक या योजनेस पात्र आहेत.

योजनेचा कालावधी 6 महिन्यांसाठी (1 मार्च 2022 ते 31 ऑगस्ट 2022 पर्यंत) होता. मात्र, अनेक ग्राहकांनी या योजनेला मुदतवाढ देण्याची विनंती करीत वीजबिल थकबाकी भरण्याची तयारी दर्शविल्याने आता या योजनेस डिसेंबर 2022 पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय महावितरण प्रशासनाने घेतला, योजनेचा लाभ घेण्यासाठी अखेरचे एक आठवडे राहिले आहेत.योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक आणि पात्र ग्राहकांनी 31 डिसेंबर 2022 पर्यंत केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे. थकबाकी एकरकमी भरण्यास इच्छुक असलेल्या ग्राहकांनी उच्चदाबाच्या वीज जोडणीसाठी मूळाच्या 95 टक्के किंवा लघुदाबाच्या जोडणीसाठी मूळ थकबाकीच्या 90 टक्के आणि सोबतच अर्ज मंजुरीच्या 30 दिवसांच्या आत आवश्यक कायदेशीर शुल्क भरावे लागेल. हप्तेवारीने पैसे भरण्यास इच असलेल्या ग्राहकांना पहिला हप्ता हा मूळ थकबाकीच्या 30 टक्के आणि सोबतच अर्ज मंजुरीच्या 7 दिवसांच्या आत आवश्यक कायदेशीर शुल्क भरावे लागेल. उर्वरित रक्कम ठराविक हप्त्यात महिन्याच्या शेवटी किवा त्यापूर्वी भरायची आहे. ज्या ग्राहकांचे अर्ज 30 सप्टेंबर 2022 रोजी किंवा त्यापूर्वी अर्ज मंजूर केले आहेत त्यांनी ३१ ऑकोबर २०२२ पर्यंत ३० टक्क्यांपर्यंत पहिला टप्पा किंवा संपूर्ण थकबाकी भरावयाची आहे.हप्तेवारीचा लाभ घेणारा ग्राहक हप्ता भरण्यास अपयशी ठलल्यास तो ग्राहक या योजनेतून अपात्र ठरविण्यात येईल आणि त्यास कोणत्याही लाभ दिले जाणार नाही.थकबाकीपोटी वीजपुरवठा खंडित केलेल्या सोयगाव परिसरातील बिगर कृषी उच्चदाब आणि लघुदाब ग्राहकांनी अधिक अधिक मोठ्या संख्येने या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन सोयगाव व सावळदबारा महावितरणचे उपकार्यकारी अभियंता निरज बिदे व सहायक अभियंता योगेश जाधव यांच्या कडून करण्यात आले आहे.

# जामनेर तालुक्यातील फत्तेपूर बंदीत दोन मोटारसायकलची समोरासमोर धडक

## दोन जणांचा जागीच मृत्यू तर एक जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील फत्तेपूर या गावापासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावरील असलेल्या बंदीमध्ये दि.२२/१२/२०२२ रोजी सकाळी अकरा वाजेच्या दरम्यान दोन मोटारसायकलची समोरासमोर टक्कर होऊन दोघांचा जागीच मृत्यू झाला तर मुलगा जखमी झाला आहे.



मयत शेख सांडू शेख हुसेन



मयत मनोहर पांडुरंग दांडगे

जळगाव रस्ता राज्य मार्गावर असलेल्या 44 पिंपळगांव चौभे येथून हाकेच्या अंतरावर असलेल्या निवांत ढाब्याजवळ बंदीजवळ दोन दुचाकींमध्ये जोराची टक्कर होऊन अपघात झाला आहे. हा अपघात इतका भीषण होता की अपघात स्थळी अक्षरशः रक्ताचा सडाच पडलेला होता. या अपघातात सोयगांव तालुक्यातील डाभा येथील मनोहर पांडुरंग दांडगे वय 52, मोटारसायकल क्रमांक MH-19 CL 6160 यांचा पण जागीच मृत्यू झाला आहे. सावळदबारा येथील शेख सांडू शेख हुसेन वय 55 वर्षे यांचाही जागीच मृत्यु झाला आहे.

या अपघात शेख मोसीन शेख सांडू वय 20 हे हिरो स्प्लेंडर MH-20 FD 2833 हे जखमी झाले आहे. अपघाताची नोंद फत्तेपूर पोलीस चौकीत करण्यात आली आहे. सध्या फत्तेपूर पोलीस या प्रकरणी तपास करत आहेत. सध्या या भीषण अपघातानं रस्ते अपघातांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.या अपघातात मयत झालेली दोन्हीही व्यक्ती ह्या सोयगाव तालुक्यातील असून अपघात ग्रस्त जखमी व्यक्तीला जळगाव येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. डाभा येथील मयत मनोहर पांडुरंग दांडगे हे
सेंटरिंगच्या कामानिमित्त ते बाहेर गेले होते. आपले काम आटोपून फत्तेपूरहुन ते घरी येत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. तर दुसरे अपघातात मृत्यू पावलेले शेख सांडू शेख हुसेन हे सावळदबाराहुन फत्तेपूरकडे दवाखान्यात जात होते. बंदीत निवांत ढाब्याजवळच हा अपघात झाला.

मृत्यांवर शोकाकुल वातावरणात सायंकाळी सहा वाजता डाभा येथे अंतिम संस्कार करण्यात आला तर दुसरे सावळदबारा येथील शेख सांडू शेख हुसेन यांचा रात्री दहा वाजता शोकाकुल वातावरणात दफनविधी करण्यात आला आहे.यावेळी परिसरातील नागरिकांचा मोठा जनसमुदाय उपस्थित होता. सदरील अपघातात मृत्यू झाल्याने डाभा, सावळदबारा व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. पुढील तपास फत्तेपूर पोलीस चौकीचे पो.हे.कॉ. किरण शिंपी, पो.कॉ.प्रवीण चौधरी, पो.कॉ.दिनेश मारवडकर पो.कॉ.जेहरे व जगदीश चौधरी करत आहेत.

# बालविवाह विरोधी जनजागर अभियान



आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** लहुजी साळवे व्यायाम शाळा व नेहरू युवा केंद्र नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने धर्माबाद तालुक्यातील करखेली येथे बालविवाह प्रतिबंध जनजागृती अभियान कार्यक्रम संपन्न झाला अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष नामदेव सोनकांबळे यांनी प्रसारमाध्यमाना दिली. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना काशीनाथ कुलकर्णी हे म्हणाले की,पालकांनी मुलीच्या विवाहाची घाई न करता तिच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे. मुलगी शिकली तर दोन घरांचे कल्याण होते. आपल्याकडे मुलगी म्हणजे परक्याचे धन आहे. तिला कशाला शिकवा म्हणून बालपणीच लग्न उरकले जाते, असे न करण्याचे आव्हान त्यांनी केले. याकार्यक्रमास गावातील प्रमुख व्यक्ती, सरपंच प्रतिनिधी तुकाराम खांडरे, ग्रामविकास आधकारी पवार साहेब,अंबटवार सर, सुत्रावे सर, येनगंदवार सर, पोतदारताई, ऐनावारताई,जोशीताई, गंगासागरे सर यांची प्रमुख उपास्थिती होती. या कार्यक्रमात शिवकुमार पाटील (भाग शिक्षण अधिकारी) यांचे मार्गदर्शन लाभले तसेच सस्थेचे अध्यक्ष नामदेव सोनकांबळे, व्ही. आय.पाटील मॅडम व दत्तात्रेय तोटावाड यांनी मनोगत मांडले. अभार प्रदर्शन संस्थेच संघटक रामानंद सोनकांबळे यांनी मांडले.

# 'त्या' चोरांना पकडण्यात अखेर पोलिसांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील शिऊर पोलिस स्टेशन येथे दाखल असलेल्या गु.र.न. 305/2022 व 327/2022 कलम 379 भा.द.वी. या गुन्ह्यातील शेतातील तीन सोलर प्लेट चोरीस गेल्या होत्या त्या गुन्हाचा तपास करत असताना उल्लेख केलेल्या गुन्ह्याच्या तपासात गोपनीय माहितीच्या आधारे दोन्ही गुन्ह्यातील गेलेला माल पूर्ण कन्नड येथून हस्तगत करण्यात आला असून यात कन्नड तालुक्यातील तांदुळवाडी येथील गोकुळ भागचंद ताजी व श्रीराम भिकण सावंत अश्या दोघांना अटक करण्यात आली आहेत. सदर गुन्हाचा तपास पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया ,अप्पर पोलिस अधीक्षक सुनील लांजेवार, सहायक पोलिस अधीक्षक महक स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी संदीप पाटील, पोउपनि अंकुश नागटिळक, स. फौ. तिलोकचंद पवार, पोना गणेश गोरक्ष, विशाल पैठणकर,दादाराव तायडे, विधाटे यांनी केली.

